रायगड, गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## द्रुतगती मार्गावर ट्रेलरला आग

**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मंगळवारी रात्री शॉर्टसर्किट होऊन ट्रेलरच्या केबिनला भीषण आग लागली. या आगीत ट्रेलरची केबिन पूर्णपणे जळून खाक झाली आहे. सुदैवाने चालक बचावला आहे. द्रुतगती मार्गावरुन ट्रेलर क्रमांक (एमएच १२ व्हीएफ ३९१६) हा पुण्यावरून जेएनपीटीकडे जात असताना तो बोरघाटात फूडमॉलजवळ आला असता त्याच्या इंजिनमध्ये शॉर्टसर्किट होऊन केबिनला भीषण आग लागली. चालकाने तत्परतेने ट्रेलर थांबवून तो बाहेर पडल्याने सुदैवाने बचावला आहे. मात्र, या आगीत ट्रेलरची केबिन जळून खाक झाली आहे.

## परभणी पेटलं




- बंदला हिंसक वळण
- शेकडो वाहनांची जाळपोळ

**। परभणी । प्रतिनिधी ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीची नासधूस केल्याच्या मंगळवारच्या घटनेचे तीव्र पडसाद बुधवारी परभणी शहरात उमटले. यासंदर्भात पुकारण्यात आलेल्या बंद बंदला हिंसक वळण लागले.

शहरात एका जमावाने ठिकठिकाणी मध्यवर्ती भागात वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ करीत हिंसक आंदोलन केले. प्रचंड दगडफेक करत घरांचे आणि दुकानांचे नुकसान केले. येथे ठिकठिकाणी रास्ता रोको आणि चक्काजाम करत आंदोलकांनी धुडगूस घातला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची मंगळवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास एका माथेफिरूने नासधूस केली. त्याचवेळी प्रत्यक्षदर्शींनी त्याला बेदम सोप दिला होता. पोलिसांनी जमावाला बाजूला सारत त्या माथेफिरुस ताब्यात घेतले. मात्र, त्यानंतर या घटनेचे तीव्र पडसाद उमटण्यास सुरुवात झाली. रात्री उशिरापर्यंत जमाव डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ ठाण मांडून होता. यामुळे संपूर्ण वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी आंदोलकांची समजूत घालण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरला. रात्री, अनेक ठिकाणी दगडफेक आणि लाठीचार्जच्या घटना घडल्या. या संदर्भात आंदोलकांनी बुधवारी परभणी बंदचे आवाहन केले होते. या बंददरम्यान जमावाने मोठा धुडगूस घातला. शहराच्या मध्यवर्ती भागात शेकडो वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ केली. मात्र, पोलीस या प्रकारांसमोर निष्प्रभ ठरले. अद्यापपर्यंत जिल्हा प्रशासनाने कोणतीही जमावबंदी अथवा अन्य आदेश लागू केलेला नाही. सध्या जमाव मुख्य चौकांवर ठाण मांडून आहे. त्यामुळे शहरात मोठे तणावाची वातावरण निर्माण झाले आहे.

## रायगडकरांना बोगस ‘डोस’?

**। आंबेत । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्रतील अंबाजोगाई येथील नवरात्रोत्सवात मोठ्या प्रमाणात देवीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणत येत असतात. त्याच्या आरोग्याच्या दृष्टीने राज्यातील काही जिल्ह्यांतून औषध पुरवठा करण्याचे आदेश आरोग्य विभागाने काही जिल्ह्यांना केले होते. मात्र, तेथे करण्यात आलेल्या औषध पुरवठ्यामधील काही औषधे ही बनावट असल्याची माहिती उघड झाली. त्या अकरा जिल्ह्यांमध्ये रायगड जिल्ह्याचे नावदेखील समोर आल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. मात्र, याबाबत रायगड जिल्ह्यातून अशा कोणत्याही प्रकारची औषधे पुरविण्यात आली नसल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी कृषीवलशी बोलताना दिली.**



धाराशिवला प्रिस्टल कंपनीचा औषधसाठा मिळाला होता तो परभणी, रायगड, रत्नागिरी, वाशिम, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, सिंधुदुर्ग, अमरावती, ठाणे आणि हिंगोली या जिल्ह्यांकडून पाठवला गेल्याची माहिती आहे. यातली रंजक गोष्ट म्हणजे, जेव्हा बीडमधल्या प्रकरणानंतर चौकशीला सुरुवात झाली, तेव्हा बोगस औषधांचं हे रॅकेट अजून खोलवर पोहोचलं.

बनावट औषध पुरवठाप्रकरणी अंबेजोगाई, नागापूर, वर्धा, भिवंडी अशा शासकीय दवाखान्यांमध्येच बनावट औषध पुरवठ्यांची बोगसगिरी समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. अंबाजोगाई येथील पान २ वर

### चौघांवर गुन्हा दाखल

बीडच्या अंबाजोगाई येथील शासकीय स्वराती रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. राज्य सरकारने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदारानेच बनावट औषधाचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे. याप्रकरणी सूरत आणि ठाणे या ठिकाणच्या चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. ही बनावट औषध निर्मिती आणि विक्री प्रकरणात आंतरराज्य टोळी असल्याची शक्यता वर्तवली जात असून, राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता फिर्यादीने व्यक्त केली आहे.

> रायगड जिल्ह्यातूनदेखील ते औषध पुरविण्यात आले होते. परंतु, ज्या पाच कंपन्या समोर आल्या आहेत, त्यापैकी या कंपनीचे एकही औषध पुरविण्यात आले नव्हते. आतापर्यंत रायगड जिल्हा रुग्णालय औषध भांडार यांची केलेली छाननी आणि रेकॉर्ड तपासले असता हे निदर्शनात आले आहे. औषध विभागाला विविध आवश्यक औषधे खरेदी करावी लागतात आणि याची वेगवेगळ्या विविध स्तरावर खरेदी होते. ही औषधे ज्या कंपनीकडून ही औषधे खरेदी केली जातात, त्या कंपनीची विश्वासार्हता पाहून खरेदी करणे गरजेचे आहे.
>
> – अंबादास देवमाने, जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड

**आजचा अग्रलेख**

**काहीही बदललेले नाही**

## वेधक

### दारूच्या नशेत टेरेसवरून पडून मृत्यू

**माणगाव :** माणगाव शहरातील खांदाड येथील इमारतीच्या टेरेसवरून दारूच्या नशेत खाली पडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत रंजित मुन्नू भारती (३५), मूळ रा. राघेपटह, जि. गोरखपूर हा दारू पिऊन दारुच्या नशेत खांदाड येथील इमारतीच्या टेरेसवर फोनवर बोलत होता. दरम्यान, त्याचा तोल जाऊन तो टेरेसवरुन बिल्डींगखाली उभ्या असलेल्या स्कूल बसच्या टपावर पडला. त्यास उपचाराकरिता दि. ११ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथे दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले.

### दोन बांगलादेशी तरुणींना अटक

**रसायनी :** मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील यश लॉज घोसाळवाडी येथे बांगलादेशी तरुणी रसायनी पोलिसांना आढळल्या असून, त्यांना परावृत्त करणाऱ्याला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, बांगलादेशी महिला या कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्राशिवाय अनधिकृतपणे मिळून आल्या. तसेच आरोपी शिवकुमार राजदेव यादव याने लॉजवर आल्याचे पोलिसांना कळविले नाही म्हणून रसायनी पोलिसांनी त्याला अटक करुन कारवाई केली. याबाबत फातीमा खातुन अबू सहीद हौलादर, जाकीयॉ सूलताना उर्फ रीपा रब्बीउल इस्लाम मोरोल, शिवकुमार राजदेव यादव यांना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### श्रीवर्धन समुद्रकिनारी तुंबळ हाणामारी

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन समुद्रकिनारी घोडागाडी चालक आणि सेंड बाईक चालक यांच्यामध्ये काही क्षुल्लक कारणावरून जोरदार फ्री स्टाईल हाणामारी झाली. या हाणामारीमध्ये चाबूक व काठ्यांचा सर्रास प्रमाणे वापर करण्यात आला. यात काही व्यावसायिकांना दुखापती झाल्या होत्या. याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सर्व व्यावसायिकांना आपले धंदे बंद ठेवण्याचे आदेश आहेत. शनिवार व रविवार श्रीवर्धन येथे पर्यटकांची खूप मोठ्या प्रमाणात गर्दी होती. मात्र, येथील धंदे बंद ठेवण्याचे आदेश असल्यामुळे व्यावसायिकांनी आपला मोर्चा आरावी समुद्रकिनाऱ्याकडे वळवल्याचे पाहायला मिळाले.

## भरत गोगावलेंना डच्चू देत दळवींना हवेय मंत्रीपद?

### आमदारांच्या बगलबच्चांना डोहाळे

**दळवींचं नाव यादीत नसल्यामुळे लवकरच त्यांचा स्वप्नभंग होणार असल्याची चर्चा परिसरात सुरु झाली आहे. याशिवाय वादग्रस्त चेहऱ्यांना पुन्हा संधी नको, अशी भूमिका भाजप हायकमांडची आहे. अशातच महायुतीचे आ. दळवी यांच्यावर गुन्हा दाखल असल्यामुळे भाजप दळवींना निश्चितपणे नाकारणार असल्याचे दिसून येते. त्यामुळे महेंद्र दळवी यांचं काय होणार? हे पाहणं महत्त्वाचं आहे. तर, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला दहा मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे.**

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

राजकारणात डोहाळे लागण्याचा प्रकार वारंवार अनुभवास येतो. कधी कुणाला काय डोहाळे पडतील, याचा नेम नाही. काही दिवसांपूर्वी आ. भरत गोगावले यांना पालकमंत्रीपदाचे डोहाळे लागले होते. तर आता महेंद्र दळवी यांचे कार्यकर्ते डोहाळ्यात जगत आहेत. एकीकडे महायुतीत म्हणून एकाचा पायपोस दुसऱ्याच्या पायात नसताना त्यांच्या कार्यकर्त्यांना लागलेले त्यांच्या नेत्याच्या मंत्रीपदाचे डोहाळे नेमके कोण पुरविणार, हा प्रश्नच आहे.

मंत्रीपद भेटणं इतके सोपे झाले आहे की, मनात इच्छा आली की, कार्यकर्ते फलक लावून मोकळे होतात आणि मग नेत्याचेही ते फलक पाहून ऊर भरून येते. कधी गोगावलेंच्या कार्यकर्त्यांना वाटते त्यांचा नेता मंत्री व्हावा, तर कधी दळवींच्या कार्यकर्त्यांना वाटतं त्यांचा नेता मंत्री व्हावा. ज्याला वाटलं त्याने जागोजागी तोंड उघडलं. पण, भाजपच्या मनात काय, हे या बगलबच्चांना दिसत नाही. ज्यांनी कधी निवडणूक लढवली नाही, अशा कार्यकर्त्यांचे डोहाळे पूर्ण करण्याच्या मानसिकतेत भाजपवाले नाहीत, याची कल्पना असतानाही नेत्याला खोटी स्वप्न दाखविण्याचं काम पान २ वर

## चालकाने क्लचऐवजी ॲक्सिलेटर दाबला?

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कुर्ला येथे सोमवारी रात्री झालेल्या बेस्ट बस अपघाताचा तपास पोलिसांनी सुरू केला असून, चालकाने अलिकडेच इलेक्ट्रिक बस चालविण्यास सुरुवात केल्याचं समोर आलं आहे. अवजड वाहने चालविण्याचा अनुभव त्याच्याकडे असताना केवळ १० दिवसांचे प्रशिक्षण देऊन गर्दीच्या वेळी इलेक्ट्रिक बस चालविण्यास दिल्याबाबत कुर्ला पोलीस बेस्ट प्रशासनाकडून माहिती मागविण्यात येणार आहे. पान २ वर



### परिवहन विभागाकडून बसची तपासणी

अपघातात २१ मोटारगाड्या आणि एका हातगाडीचे नुकसान झाले आहे. न्यायवैधक तज्ज्ञांनी संबंधित मोटर गाड्यांवर लागलेल्या बसच्या रंगाचे नमुने गोळा केले असून, ते परीक्षणासाठी पाठवण्यात आले आहेत. बसमध्ये तांत्रिक बिघाड होता का, हे तपासण्यासाठी पोलीस परिवहन विभागाची मदत घेणार आहेत. परिवहन विभागाच्या अहवालानुसार पुढील तपास करण्यात येणार आहे. चालक मोरेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्याला याप्रकरणी अटक करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक प्रशांत चव्हाण यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मोरेला कुर्ला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

## जिल्ह्यात धान्य वितरण ठप्प

**ई-पॉस मशीनला तांत्रिक अडचणी, ग्राहकांसह दुकानदारांचाही संताप**

**। चौल । प्रतिनिधी ।**

रेशन धान्य दुकानातून वितरीत होणारे मोफत धान्यांचे डिसेंबर महिन्याचे वितरण राज्यात ठप्प झाले आहे. एक-दोन दिवस नव्हे, तर गेले दहा दिवस ई-पॉस मशीनला तांत्रिक अडचण येत असल्याने जिल्ह्यात विविध योजनांतील तब्बल साडेसतरा लाख लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित आहेत. धान्यासाठी दररोज हेलपाटे मारावे लागत असल्यामुळे कार्डधारक ग्राहकांसह दुकानदारांतही संतापाचे वातावरण आहे. टू-जी गेले आणि फोर-जी आले, पण वितरणातील समस्या कायम असल्याने लाभार्थ्यांसह दुकानदारही त्रासले आहेत.

> धान्य पुरवठ्यासाठी नवीन एलएईऐसीएम ही प्रणाली कार्यान्वित केली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार पुरवठा विभागाचे क्लाऊड सर्व्हर, जे पूर्वी खासगी कंपनीकडे होते, ते आता राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी)कडे स्थानांतरित करण्यात आले आहे. ई-पॉस मशीनवरदेखील आधार प्रमाणीकरणासाठी यूआयडीएआय सर्व्हरला सर्व समस्यांचे निराकरण होऊन धान्यपुरवठा सुरळीत होईल, अशी अपेक्षा आहे. – कौस्तुभ जोशी, सचिव, अलिबाग तालुका, रास्त भाव दुकानदार संघटना

रायगड जिल्हह्यातील १५ तालुक्यांमध्ये एकूण १,४४६ रास्त भाव दुकाने आहेत. रायगड जिल्ह्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक ८१,४१९ असून, लाभार्थी संख्या पान २ वर

## तलवारीने वार

**पनवेल :** तलवारीने वार करून लाकडी काठ्या आणि बांबूने मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुदर्शन खंडागळे, रोहित होळकर, विपुल आणि विवेक शिंदे अशी चौघांची नावे आहेत.

विशाल सिंह कुवर बहादुर सिंह (२९) तळोजा फेस वन सेक्टर १० येथे राहात आहे. तो देशी दारू विक्रीचा व्यवसाय करतो. खारघर रेल्वे स्टेशनजवळ रिक्षा चालवणारे सुदर्शन खंडागळे व त्याचे मित्र विवेक शिंदे, रोहित होळकर व विपुल हे त्यांच्याकडून देशी दारू विकत घेत असत. सात डिसेंबर रोजी सुदर्शन खंडागळे यांनी झोपेतून उठवून देशी दारू मागितली. यावेळी दारू संपली असून, उद्या आलात तर भेटेल, असे सांगितले. पान २ वर




**सिडकोकडून पाईपलाईनसाठी नदीत खोदाई**

## भोगावतीच्या नशिबी भोग

- महसूल तसेच जलसंपदा विभाग मात्र अनभिज्ञ

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहराची जीवनवाहिनी म्हणून समजल्या जाणाऱ्या भोगावती नदीला गेल्या तीन ते चार वर्षांत अतिक्रमणाच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याकडे महसूल खाते, जलसंपदा खाते उघड्या डोळ्याने पाहात आहेत. दिवसेंदिवस नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. त्यातच सिडकोने आपली पाईपलाईन विश्वेश्वर धरणापासून पुढे नदीतून टाकण्यास सुरुवात केलेली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, याबाबत महसूल अथवा जलसंपदा खात्याला काहीही माहिती नसल्याचे समोर येत आहे.

११ डिसेंबर रोजी पेण प्रसार माध्यामांच्या प्रतिनिधींनी सकाळी ११ वाजता भोगावती नदी गाठली. तेव्हा समोर आलेले चित्र खूपच विदारक होते. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात दगड फोडून उत्खनन केले होते. तर, काही भागात मोठ्या प्रमाणात मातीचा भरावदेखील केलेला दिसत होता. पान २ वर



नदीतून पाईपलाईन टाकण्याबाबत ठेकेदाराकडे कोणतीही ठोस कागदपत्रे नाहीत. फक्त तोंडी आदेश दिल्याचे त्यांच्याकडून समजते. त्यामुळे निसर्गप्रेमी काम त्वरित थांबवले नाही तर तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करतील.

> भोगावती नदीमध्ये सुरु असलेल्या अतिक्रमणाबाबत जलसंपदा विभागाकडे कळविण्यात येईल. जे गौण खनिज उत्खनन झालेले आहे, त्याबाबत दंडात्मक कारवाई केली जाईल. तसे पंचनामे मंडळ अधिकारी व तलाठ्याने केलेले आहेत, त्यानुसार दंड ठोठावण्यात येईल.
>
> – तानाजी शेजाळ, तहसीलदार

# माथेरानचा पाणीपुरवठा बंद

## पर्यटन हंगामावर परिणाम होण्याची शक्यता

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळांवर राहणाऱ्या नागरिकांना आणि येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी पाणी महत्त्वाची बाब आहे. नेरळ येथील उल्हास नदी येथून होणारा पाणीपुरवठा पाच दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे दुसरीकडे माथेरान शहराला मागील काही वर्षांपासून शार्लोट लेकमध्ये असलेले पाणी उचलून त्याचे वितरण केले जात आहे. दरम्यान, माथेरानमधील पर्यटन हंगाम लक्षात घेता नेरळ येथून होणारा पाणीपुरवठा बंद राहिल्यास पर्यटन हंगामावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यावसायिक व्यक्त करीत आहेत.

नाताळ आणि नवीन वर्षाचे स्वागतासाठी माथेरानमध्ये हजारो पर्यटक येत असतात. मात्र, त्याआधी दहा दिवस माथेरानमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईने शहरातील नागरिकांना त्रस्त केले आहे. शहरात अनेक भागात पिण्याचे पाणी वेळेवर पोहोचत नाही. दुसरीकडे माथेरान शहरात दररोज येणारे पर्यटक आणि शनिवार-रविवारी वीकेंड लक्षात घेऊन पर्यटकांची गैरसोय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माथेरान



हे ८०० मीटर उंचीवर असलेले पर्यटन स्थळ असून, ब्रिटिशांनी तेथे राहणाऱ्या लोकांसाठी शार्लोट लेक बांधले आणि तेथील पाणी शहरातील नागरिकांना दिले जाते. मात्र, माथेरानमधील जनता आणि येणारे पर्यटकांची गैरसोय दूर करण्यासाठी नेरळजवळील कुंभे येथून वाहणाऱ्या उल्हास नदीवरून पाणी उचलून ते २० किलोमीटर अंतरावर नेले. नेरळ येथील कुंभ येथे असलेल्या पंप हाऊसमधून दररोज १८-२० तास पाणी उचलून माथेरान येथे पाठवले जाते. त्याचा फायदा माथेरानमधील शार्लोट लेकमधील पाणीपुरवठा शहरासाठी राखीव ठेवण्यात येत असतो.

मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिपत्याखाली असलेल्या माथेरान नळपाणी योजनेसाठी उल्हास नदी येथून पाणी उचलून नेले जाते. गेली पाच दिवस नेरळ कुंभे येथील पंप बिघडल्याने माथेरान शहरातील पिण्याच्या पाण्याचे नियोजन बिघडले आहे. उल्हास नदीमधून उचलले जाणारे पाणी गेली पाच दिवस उचलणे बंद झाले असून, त्याचा थेट परिणाम माथेरानमधील जनजीवनावर झाला आहे. माथेरान शहरात मागील तीन दिवस अनेक भागात पिण्याचे पाणी पोहोचले नाही. त्यात आता माथेरानमध्ये मागील तीन दिवसांपासून शार्लोट लेकमधून पाणी उचलून शहरात वितरित

> **माथेरान पाणीपुरवठा नियोजन पूर्णपणे अनियमित होत आहे.मागील तीन ते चार दिवसांपासून नेरळ पंप बंद आहे. माथेरान येथे ५० एचपी क्षमतेचा एकच पंप चालू आहे. आम्ही शक्य होईल तेवढे पाणी ग्राहकांना देण्याचा प्रयत्न करत आहोत. संपूर्ण माथेरानमध्ये एकाचवेळी पाणीपुरवठा करणे सध्या शक्य नाही. त्यामुळे नेरळ पंप सुरळीतपणे लवकर चालू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.**
>
> **– संजय वेंगुर्लेकर, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

करण्याचा प्रयत्न जीवन प्राधिकरण यांच्याकडून सुरू आहे. दोन दिवसांनी माथेरानमधील शनिवार-रविवार हा वीकेंड असून, माथेरान शहराला नेरळ येथून पाणीपुरवठा झाला नाही, तर मात्र तेथील पर्यटन धोक्यात येणार आहे.

> **माथेरानमध्ये येणारे नेरळ कुंभ येथील पाणी येणे बंद आहे. ही स्थिती दोन दिवसांत सुधारणे अत्यंत आवश्यक बाब आहे, नाहीतर येणारा वीकेंड धोक्यात येऊ शकतो.**
>
> **– प्रसाद सावंत, हॉटेल व्यावसायिक**

सध्या शार्लोट लेकमधून पाणी उचलले जात आहे. मात्र, सतत सुरू असलेल्या पाणी उचलण्याच्या प्रक्रियेमुळे शार्लोट लेकमधील पाण्याची पातळी कमी होत आहे. दुसरीकडे तेथेदेखील सध्या एकच ५० एचपी क्षमतेचा पंप कार्यान्वित असून, तो पंप बिघडला तर मात्र शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. तर, माथेरानसाठी होणारा पाणीपुरवठा नेरळ येथून आणखी काही दिवस सुरू होण्याची शक्यता नाही. नेरळ कुंभ येथील विजेचा पंप बिघडला असून, तो दुरुस्त करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे ते पंप दुरुस्त होण्यास आणखी काही दिवस लागले तर मात्र माथेरानमधील जनतेच्या तोंडचे पाणी पळून जाणार आहे.

# रत्नप्रभा बेल्हेकरांच्या कार्याचा गौरव

## ■ महिला सक्षमीकरणासाठी प्रतिभा सन्मान पुरस्कार

**। अलिबाग । वार्ताहर ।**

प्रभा गृहद्योगच्या सीईओ आणि जागृती फाऊंडेशनच्या सर्वे सर्वा रत्नप्रभा बेल्हेकर यांना महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल नवी दिल्ली येथे राष्ट्रीय प्रतिभा सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम शनिवारी (दि. ७) लिंगायत लालितादेवी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली येथे गोल्डन स्पारो या संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून टेलिव्हिजनवरील 'महाभारत' या सीरियलमध्ये युधिष्ठिरची भूमिका साकारणारे अभिनेते गजेंद्र चौहान, प.पू. साध्वी प्रज्ञा देवी, आयोजक डॉ. तिलक तन्वर, ऑल इंडिया रेडिओचे आर.जे. आरती मल्होत्रा आणि इतर मान्यवरसुद्धा उपस्थित होते.

संपूर्ण भारतातून फक्त ५१ पुरस्कार्थी निवडण्यात आले होते. रायगड जिल्ह्यातून रत्नप्रभा बेल्हेकर ह्या एकमेव पुरस्कार प्राप्त होत्या. सौ. बेल्हेकर ह्या गेली २५ वर्षे स्वतःचा फूड



आणि टेलरिंग व्यवसाय चालवितात. परंतु, स्वतःच्या प्रगतीबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रात गरीब आणि गरजू महिलांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी मोफत व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा त्यांचा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे. आजपर्यंत त्यांनी जवळ जवळ ४५०० महिलांना आपला अमूल्य वेळ देऊन व्यावसायिक प्रशिक्षण तर दिलेच; पण त्यांच्या कौटुंबिक समस्या सोवण्यासाठीसुद्धा नेहमी तत्पर असतात. सरकारी स्कीम राबवणे, मुलांना शैक्षिणक साहित्य पुरवणे, फीस भरणे यासारखी कामे त्या आनंदाने करतात. आतापर्यंत त्यांना बरेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांच्या आयुष्याचे एकच ध्येय आहे. समाजातील प्रत्येक महिला ही सक्षम झाली पाहिजे. या कार्यासाठी त्यांच्या टीमचे कौतुक करण्यात येत आहे.

# पेझारीत दत्तजयंती उत्सवाचे आयोजन

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील पेझारी येथे दत्तजयंती उत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त श्रीपंत भक्त मंडळातर्फे शुक्रवार, दि. १३ व शनिवार, दि. १४ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी (दि. १३) वाघोडे येथे सकाळी ७ वाजता अवधूत मठ येथे ध्वजारोहण, सकाळी ८ वाजता अवधूत मठ येथून औदुंबर कट्टामार्गे नागझरीमधून प्रेमध्वज फेरी काढून वाघोडे येथे येईल. त्यानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसाद तसेच दुपारी २ वाजता प्रेमध्वज फेरी वाघोडे येथून निघून बांधणमार्गे दत्तमंदिर पेझारी येथे येईल. तर, पेझारी येथे सकाळी ७ वाजता दत्तमंदिर येथून प्रेमध्वज पालखीचे प्रस्थान होईल. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता दत्त मंदिरासमोर ध्वजारोहण करण्यात येईल.

शनिवारी (दि. १४) पहाटे ४ वाजता श्रींची पूजा व अभिषेक होईल. त्यानंतर ५ वाजता दत्तात्रेय सहस्र नामावली पठण करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ८ वाजता दत्तमंदिर येथून पालखीचे प्रस्थान होईल. दुपारी १ वाजता पालखीचे आगमन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता श्रींचा जन्मोत्सव सोहळा आणि सायं. ७ वाजता प्रेमळ सुनंदाताई राणे महिला मंडळ, पेझारी यांच्या भजनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर रात्री ८.३० वाजता दत्त प्रेमलहरीमधील पदांवर टिपरी



नृत्य होणार आहे. रात्री १० वाजता आरती करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येईल. तरी सर्व भाविकांनी दर्शनाचा व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# गोपाळ भगत यांनी जपली सामाजिक बांधिलकी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांचा जन्मदिवस दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी त्यांनी एमजीएम हॉस्पिटल कलंबोली, ज्योती केअर सेंटर, परमशांती वृद्धाश्रम तळोजे या ठिकाणी रुग्णांना सामाजिक बांधिलकी म्हणून फळ



वाटप करण्याचा उपक्रम राबवला गेला. तसेच गुरुकुल आश्रम जाधव वाडी सातारा येथील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूचे वाटप करण्यात आले. प्रथम सकाळी दहा वाजता शेतकरी कामगार पक्ष कळंबोली कार्यालयात त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी नगरसेवक विष्णू जोशी, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, माजी नगरसेवक रवींद्र भगत, माजी नगरसेविका प्रिया विजय भोईर, माजी नगरसेवक गणेश कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून

## रायगडकरांना बोगस 'डोस'?

शासकीय स्वराती रुग्णालयाला पुरवठा करण्यात आलेल्या अजिथ्रोमाइसिन गोळ्यांचे नमुने गतवर्षी औषध विभागाने तपासणीसाठी घेतले होते. याचा अहवाल वर्षभरानंतर प्राप्त झाला. यात ही गोळी अप्रमाणित असल्याचं समोर आलं. कोल्हापूरच्या विशाल एंटरप्राइजेस एजन्सीकडून जवळपास २५ हजार गोळ्यांचा पुरवठा २९ जुलै २०२३ रोजी रुग्णालयाला झाला होता. मात्र, तपासाअंती या गोळ्या अप्रमाणित असल्याचं उघड झाल्यानंतर खळबळ उडाली. रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार दिसून आला. दरम्यान, या प्रकरणात औषध निरीक्षक मनोज पैठणे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाल्यानंतर स्वराती रुग्णालयाकडून द्विसदस्य चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. बीडच्या अंबाजोगाईतील बनावट औषध पुरवठाप्रकरणी स्वराती रुग्णालयाकडून द्विसदस्य चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. यातील विशाल एंटरप्राइजेस एजन्सीचे बिल थांबवण्यात आले असून, एजन्सी ब्लॅक लिस्ट करण्यात आली असल्याचीही माहिती समोर आली आहे.

बनावट कंपन्यांद्वारे महाराष्ट्रातल्या तब्बल ११ जिल्ह्यात गोळ्या-औषधांचं पुरवठा झाल्याची धक्कादायक गोष्ट समोर आली आहे. गंभीर म्हणजे, जानेवारीपासून सरकारी संस्थांमधून या गोळ्या-औषधांचा पुरवठा झाला आहे. गेल्या सरकारमधले आरोग्यमंत्री तानाजी सावंतांच्या धाराशिव जिल्ह्यातही बनावट औषधे पुरवण्यात आल्याची माहिती एका वृत्तपत्राने दिली आहे. सुदैवानं औषध विभागाने तो साठा प्रतिबंधित केल्याने त्याचं वितरण झालं नाही. पण, इतर जिल्ह्यांमध्ये बनावट औषधांचं वाटप झाल्याचं समोर येतं आहे. बीडमधल्या अंबाजोगाईत सरकारी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातही हा साठा होता. याप्रकरणी सूरत आणि ठाणे या दोन ठिकाणी चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे सर्वसामान्य लोकांसाठी मोठा आधार मानलं जातं. पण इथं एका ॲंटिबायोटिक गोळीत एजीथ्रोमायसिन हा घटकच नसल्याचं समोर आलं आहे.

महाराष्ट्रात ज्या पाच बोगस औषधं कंपन्यांकडून ११ जिल्ह्यांत औषधं पुरवठा झाल्याची बाब समोर आल्यानंतर अनेक नवनवीन पुरावे समोर येत आहेत. या औषध कंपन्या केरळ, उत्तराखंड आणि आंध्र प्रदेशमध्ये निर्मिती करत असल्याचं समोर आल्यानंतर येथील माहिती राज्याचा औषधं नियंत्रण मंडळाने मागवली असता प्रत्यक्षात या ठिकाणी या कंपन्याच नसल्याचं निदर्शनात आले आहे. यानंतर या कंपन्यांकडून कुठे कुठे औषधे पुरविली गेली असल्याचा अहवाल मागवला असता एकूण ११ जिल्ह्यांत याचा पुरवठा झाल्याचं समोर आले आहे.

## भरत गोगावलेंना डच्चू देत दळवींना हवेय मंत्रीपद?

हे कार्यकर्ते करीत आहेत. शिंदे गटात असलेले वादंग आणि नेत्यांमधील कुरघोडी पाहता, हे डोहाळे कधीही पूर्ण न होणारे आहेत, हे स्पष्ट झालं आहे. पण, तरीही तेवढ्यापुरते का होईना, कार्यकर्ते आणि भाऊंचे पण समाधान होत असल्याचे दिसून येते.

**शिंदेंच्या मंत्र्यांची यादी दिल्लीत?**

येत्या १४ तारखेला राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता आहे. त्या आधी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या संभाव्य मंत्र्यांची यादी दिल्लीत पाठवल्याची माहिती मिळतेय. येत्या १६ तारखेला नागपुरात हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. त्यापूर्वी १४ तारखेला मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीची यादी अंतिम शिक्कामोर्तबसाठी दिल्लीला पाठवल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भाजपच्या हायकमांडचा ग्रीन सिग्नल मिळाल्यानंतर विस्ताराचा मार्गही मोकळा होणार आहे. दिल्लीत पाठवलेल्या शिंदेंच्या यादीमध्ये उदय सामंत, शंभूराज देसाई, तानाजी सावंत, दादा भुसे, गुलाबराव पाटील, राजेश क्षीरसागर, प्रकाश सुर्वे, प्रताप सरनाईक, संजय शिरसाट, भरत गोगावले, हेमंत पाटील यांची नावं असल्याचे कळतंय.

## चालकाने क्लचऐवजी ॲक्सिलेटर दाबला?

धक्कादायक म्हणजे, संबंधित चालकाने क्लचऐवजी ॲक्सिलेटर दाबल्याने अपघात घडल्याची माहिती हाती आली आहे.

आरोपी मोरे याला क्लच आणि गिअरची अवजड वाहने चालिवण्याचा अनुभव होता. अपघात झाला त्यावेळी त्याने क्लच समजून चुकून ॲक्सिलेटरवर पाय दिल्यामुळे बस थांबण्याऐवजी तिचा वेग वाढल्याची माहिती हाती आली आहे. आसपास भरपूर वर्दळ असल्यामुळे गाडी रस्त्यावर ठेवण्याच्या प्रयत्नात त्याने अनेक वाहने आणि पादचाऱ्यांना उडविले आणि बसचा वेग कमी करण्यासाठी भिंतीला धडक दिली, अशी माहिती तपासात समजली असून, त्या दिशेने तपास करण्यात येत असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

## भोगावतीच्या नशिबी भोग

त्याप्रमाणे पाईप कट करण्यासाठी गॅस कटरला वापरण्यात येत असणारा गॅस हा घरगुती वापराचा होता. त्यामुळे प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी तहसीलदार तानाजी शेजाळ यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून नदीत चाललेल्या अतिक्रमणाबाबत कल्पना दिली. त्यांना नदीत असा काही प्रकार चाललेला आहे हे माहीत नव्हते, तेव्हा त्यांनी तातडीने घटनास्थळी पेण मंडळ अधिकारी सुजाता जाधव, पेण तालाठी अनिकेत पाटील, महसूल सेवक सचिन घरत, महसूल सेवक किरण पवार यांना पाठवले. त्यांनी तातडीने सर्व बाबींचे पंचनामे केले. परंतु, खरी गमंत तर पुढेच होती. सिडको पाईपलाईनचे काम स्काय वे कंपनी करीत आहे. हे तेथे असलेले सुपरवायझर अशोक मंडळ यांना तलाठ्याने दटावून विचारल्यावर सांगितले व आमच्याकडे कंपनीकडून कोणतीच परवानगीची कागदे दिलेली नाहीत. नदीतून पाईपलाईन टाकण्यास फक्त तोंडी सांगितले आहे. त्यामुळे आमच्याकडे आत्ता तरी परवानगीची कोणतीच कागदे नाहीत, असे सांगितले. त्यानंतर प्रसार माध्यामांच्या प्रतिनीधींनी सखोल माहिती घेतल्यानंतर असे समजले की, सिडकोकडून पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी अगोदरच जागा संपादन केलेली आहे. परंतु, त्या जागांवर अतिक्रमण झाल्याने अतिक्रमण खाली न करता सिडको बिनधास्तपणे नदीत अतिक्रमण करुन पाईपलाईन टाकत आहे. याचाच अर्थ, सिडको अतिक्रमण करणाऱ्यांना अभय देत आहे असेच आहे. नदीपासून जो जुना रस्ता आहे, त्याला सिडकोने अगोदर मार्किंग केलेली आणि त्या रस्त्यातून ती लाईन जाऊन वरती कॉंक्रिट करुन व्यवस्थित रस्ता करुन देणार होते. परंतु, हे कोणाच्या सांगण्यावरून की कोणाला वाचवण्यासाठी किंवा अतिक्रमण वाचवण्यासाठी किंवा सिडको स्वतःची हक्काची जागा सोडून नदीतून पाईपलाईन टाकते आणि नदी अक्षरशः उद्ध्वस्त करत आहे. तर हे चुकीचे आहे. हे कुठेतरी थांबणे गरजेचे आहे.

**सिडकोची पाईपलाईन जुन्या जागेतून जाणे गरजेचे आहे. परंतु, आता भोगावती नदीतील कातळ खोदून ही पाईपलाईन सुरु आहे. सिडकोच्या पाईपलाईनला आमचा विरोध नाही. पण, ती नदी खोदून ती टाकू नये. त्यांच्या हक्काच्या जागेतून त्यांनी न्यावी. - प्रा. उदय मानकवळे, निसर्गप्रेमी**

## तलवारीने वार

यावेळी सुदर्शनने शिवीगाळ केली. त्यानंतर आठ डिसेंबर रोजी सुदर्शन, विवेक, रोहित आणि विपुल हे त्या ठिकाणी आले आणि त्यांनी रात्रीच्या प्रकाराबाबत जाब विचारला. यावेळी सुदर्शन खंडागळेने तलवारीने डोक्यावर डाव्या बाजूला घाव घालून दुखापत केली आणि त्याच्या मित्रांनी लाकडी काठी आणि बांबूने मारहाण केली. यावेळी झोपडीत असलेले मित्र अरुण आणि रायकुमार हे बाहेर आले, त्यावेळी सुदर्शनने त्यांच्या डोक्यावर तलवारीने वार केले आणि सोबतच्या मित्रांनी लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले.

## जिल्ह्यात धान्य वितरण ठप्प

२,५३,०४८ इतकी आहे. प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांची संख्या ३,३७,१९२ एवढी असून, १५,०८,५६१ लाभार्थी आहेत. अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना गहू आणि तांदूळ मोफत दिला जातो. याकरिता हे धान्य संबंधित दुकानदारापर्यंत महिन्याअखेरपर्यंत पोहोचवले जाते. यानंतर पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या मोफत धान्याचे रेशनधान्य दुकानातून वितरण सुरू होते. महिन्याच्या पहिल्या पंधरा दिवसांत बहुतांशी सर्व काडधारकांना धान्य वितरीत होते.

डिसेंबर महिन्यासाठीचे धान्य दुकानदारांपर्यंत जमा झाले आहे. मात्र, त्याचे ई-पॉस मशीनला आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे वितरण सुरू झालेले नाही. संपूर्ण राज्यात ही परिस्थिती असल्याने अद्याप एकाही जिल्ह्यात या महिन्याचे धान्याचे वितरण सुरू झाले नसल्याचे चित्र आहे. याबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच तालुका पुरवठा अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही. त्यामुळे धान्यपुरवठा कधीपासून सुरळीत होईल, याविषयी अनिश्चितता कायम आहे.

**कार्डधारक-दुकानदारांमध्ये वादाचे प्रसंग**

दर महिन्याच्या तीन ते चार तारखेपासून धान्य मिळायला सुरुवात होते. यामुळे पहिन्या आठवड्यात धान्य नेण्यासाठी दुकानात येणाऱ्या कार्डधारकांची संख्या अधिक असंते. या महिन्यातही ग्राहक दुकानात येत आहेत. मात्र, धान्य मिळत नसल्याने ते रिकामे हाती परत जात आहेत. ई-पॉस मशीन कधी सुरु होईल, हे सांगता येत नसल्याने अनेकांचे वारंवार हेलपाटे होऊ लागले आहेत. त्यातून अनेक ठिकाणी कार्डधारक आणि दुकानदारांमध्ये वादावादीचे प्रसंग होत आहेत. यामुळे कार्डधारकांबरोबर दुकानदारही संतापले आहेत.

**नवी ई-पॉस असूनही अडचणी कायम**

धान्य दुकानादारांना ४-जी तंत्रज्ञान असेलली नवीन ई-पॉस मशीन दिली आहेत. मात्र, यूपर्वीच्या जुन्या मशीनबाबत असणाऱ्या अडचणी आता या नवीन मशीनलाही येऊ लागल्या की काय, असा सवाल उपस्थित होत आहे. मशीन नवीन आल्यानंतरही अडचणी कायम असल्याचे चित्र आहे.

**मंत्रालयातून आलेला मॅसेज..**

आम्हाला माहीत आहे की, धान्यवितरणात समस्य येत आहेत. सध्या आम्ही आमच्या सिस्टीम Azure क्लाऊडवरुन Nic क्लाऊडवर स्थलांतरित करीत आहोत. त्यामुळे प्रणाली स्थिर होण्यासाठी एक-दोन दिवस लागतील. तसेच आधार कनेक्टिव्हिटी समस्या आहेत. त्यामुळे कृपया सहकार्य करा.

**दुकानात धान्याचा साठा आहे, परंतु ई-पॉस मशीनमध्ये मागील दहा दिवसांपासून तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यामुळे वितरणात अडथळा निर्माण होत आहे. धान्यासाठी ग्राहक वारंवार हेलपाटे मारत आहेत. परंतु, रिकाम्या हाती परत जावे लागत असल्यामुळे अनेकदा शाब्दिक बाचाबाची होत आहे. तांत्रिक अडचण दूर झाल्यानंतर लागलीच धान्य वितरण करण्यात येईल. - महेंद्र पाटील, अध्यक्ष, अलिबाग तालुका रास्त भाव दुकानदार**

**रेशनवर धान्यासाठी आतापर्यंत सात ते आठ वेळा आलो, परंतु मशीनमधील तांत्रिक अडचणींमुळे परत जावे लागले आहे. आधी टू जी होते, आता फोर जी आले, मात्र समस्या त्याच आहेत. यात सुधारणा होणे गरजेचे आहे. रेशनवर धान्यसाठी सकाळी यायचे, रांगेत उभे राहायचे, आणि मशीन चालू नसल्याचे सांगताच परत माघारी फिरायचे. अजून हे किती दिवस चालणार? - संतोष नाईक, लाभार्थी, चौल**

# मुस्लिम कुटुंबाबद्दल आक्षेपार्ह विधान

## ■ नितेश राणेंच्या वक्तव्यावरुन नवा वाद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भाजप नेते नितेश राणे यांच्या एका वक्तव्यावरून राजकारण चांगलेच तापू लागलं आहे. मुस्लिमांना मोदी पसंत नाहीत, असं विधान माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे यांनी केलं आहे. ज्या मुस्लिम कुटुंबांमध्ये दोनपेक्षा जास्त मुले असतील त्यांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

महाराष्ट्रात महायुतीच्या विजया मागे ही योजना एक महत्त्वाचे कारण मानले जात असतानाच, नितेश राणेंचे हे विधान राजकारण तापवणार ठरु शकतं. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत कणकवलीतून नितेश राणे विजयी झाले आहेत. मात्र, त्यानंतर त्यांना कुठलंच भान नसल्याचं त्यांच्या वक्तव्यावरुन दिसत असल्याचं मत नागरिकांनी व्यक्त केलं आहे.



बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ आयोजित एका कार्यक्रमात नितेश राणे यांनी, दोनपेक्षा अधिक अपत्य असणाऱ्या मुस्लिम कुटुंबांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळू नये, अशी भूमिका मांडली. मुस्लिम समाजातील लोक निवडणुकीत ना मोदीजींच्या, ना महायुतीच्या पाठीशी होते. पण सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी मुस्लिम समाजातील लोक पुढे असतात. राणे यांनी लाडकी बहीण योजनेत बदल करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात आपण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचं राणेंनी म्हटलं आहे. नितेश राणे म्हणाले की, बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याक असून, त्यांना मारहाण केली जात आहे. पाकमध्येही हिंदू अल्पसंख्याक आहेत, त्यांना एकतर इस्लाम स्वीकारण्याचा पर्याय देण्यात येतो किंवा ठार मारण्यात येते. याउलट, आपल्या देशात त्यांच्यावर किती प्रेम केले जाते. त्यांच्यासाठी विविध योजना आखल्या जातात.

# अविनाश म्हात्रे पुरस्काराने सन्मानित



**। रसायनी । वार्ताहर ।**

जागतिक मानव अधिकार दिनाचे औचित्य साधून समाजसेवा, कुष्टमित्र अविनाश चिंतामण म्हात्रे यांना समाजसेवा रत्न २०२४ या पुरस्काराने जागतिक मानव अधिकार सुरक्षा फाऊंडेशन दिल्ली (भारत) यांच्यावतीने क्षेत्र त्रंबकेश्वर नाशिक येथे सन्मानित करण्यात आले. अविनाश म्हात्रे यांचे समाजसेवेचे कार्य हे अतुलनीय असून, पत्रकारिता आणि त्यांच्या विविध सामाजिक कार्याचा उल्लेख वाखाणण्याजोगा आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कंठानंद स्वामी, अध्यक्ष रामकृष्ण आरोग्य संस्थान, संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आहेर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष राम घरत, राष्ट्रीय महासचिव राजेंद्र मोरे, राष्ट्रीय कमिटीचे वाल्मिक जाधव, आबाजी गोंदकर, यशवंत शिरसाट, ज्ञानेश्वर सोनावणे, राष्ट्रीय कमिटी, महाराष्ट्र कमिटी, राष्ट्रीय कमिटी सेल, महाराष्ट्र कमिटी सेल आणि संपूर्ण भारतातून अनेक पदाधिकारी आले होते.

**PUBLIC NOTICE**

**NOTICE** is hereby given that, under the instructions of our client, we are investigating the right, title and interest of (1) Mrs. Zamina alias Devika Altaf Patel and (2) Mr. Altaf Latif Patel (**"Owners"**) with respect to the Land and the structures standing thereon more particularly described in the **First Schedule** and **Second Schedule** hereunder written (**"Property"**), as the Owners have agreed to sell and transfer the said Property to our client on ownership basis with a clear and marketable title, free from any and all encumbrances and claims.

The Owners have represented to our client that the original Sale Deed (**"Sale Deed"**) dated 19th November, 1994 executed by and between (1) Mr. Mahadeo Baburao Nakhwa, (2) Mr. Nyaneshwar Baburao Nakhwa, (3) Mr. Namdeo Baburao Nakhwa, (4) Mr. Ramkrishna Murari Nakhwa, (5) Balkrishna Murari Nakhwa, (6) Mr. Kashinath Murari Nakhwa, (7) Mrs. Shakuntala Padharinath Nakhwa and (8) Mr. Ramchandra Arjun Nakhwa as the Vendors and (1) Mrs. Zamina alias Devika Altaf Patel and (2) Mr. Altaf Latif Patel as the Purchasers in respect of the said Property is not traceable and not in the possession of the Owners, in spite of diligent search carried out by them. All persons are hereby informed not to deal or carry out any transaction with anyone on the basis of the aforementioned Sale Deed. If anyone has already carried out or is carrying out or has any right title or interest in the said Property is hereby notified to inform the undersigned in writing on the below mentioned address within **7 (seven) days** from date of this publication.

All persons/entities including inter alia any bank and/or financial institution and/or authority having any right, title, benefit, interest, share, claim or demand in respect of the Property and/or part thereof by way of sale, transfer, exchange, let, lease, sub-lease, tenancy, sub-tenancy, assignment, mortgage, charge, lien, inheritance, bequest, succession, gift, maintenance, easement, trust, possession, occupation, care-taker basis, family arrangement/ settlement, Decree or Order of any Court of Law, contracts/agreements, development rights, FSI Consumption, TDR, partnership, Will, possession or otherwise of whatsoever nature, are hereby required to make the same known in writing, along with notarially certified true copies of documentary evidence to the undersigned at the address mentioned below within **7 (Seven) days** from the date of the publication of the public notice. If no claim is made, the transaction may be entered into without any reference or regard to any such purported claim or interest in the said Property which shall be deemed to have been waived for all intents and purposes and not binding on our client.

**THE FIRST SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**

All those pieces and parcels of agricultural land bearing Gat No. 519/1 admeasuring 0-22-30 H.R. of Village Sasawane, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra and the structures standing thereon and the land bounded as under:

On North: Government Road (Dhokawade Sasawane Road) and Gat no. 518
On South: Gat No.519/2
On East: Creek
On West: Gat No.520 and Gat No. 525

**THE SECOND SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**

All those pieces and parcels of agricultural land bearing Gat No. 519/2 admeasuring 0-30-00 H.R. of Village Sasawane, Taluka Alibaug, District Raigad, Maharashtra and the structures standing thereon and the land bounded as under:

On North: Gat No.519/1
On South: Government land and Government Road (Awas Sasawane Road)
On East: Government Road and Creek
On West: Gat No.520 and Gat No. 525

Dated this **12th** day of **December, 2024.**

For **AAK Legal**
**Sd/-**
**Ms. Aziza Khatri**
**AAK Legal**
**Advocates & Solicitors**
Sir Vithaldas Chambers,
507 to 509, 5th Floor,
16, Mumbai Samachar Marg,
Fort, Mumbai 400001
Email:- aziza@aaklegal.in

# महामार्गाचे काम रखडले

## महामार्गावरील अनेक पुलांची कामे अद्याप अपूर्ण

## महामार्गाला पूर्ण होण्यास अजून दोन वर्षे लागणार



● (संग्रहीत छायाचित्र)

**। रायगड । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीपूर्वी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याचे आश्वासन नेतेमंडळींनी आपल्या भाषणातून दिले होते; मात्र सध्या सुरू असलेले काम संथगतीने सुरू असून मार्गावरील अनेक पुलांची कामे अद्याप अपूर्ण आहेत. ही सर्व कामे पूर्ण होण्यास कमीत कमी दोन वर्षे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील वडखळपर्यंतच्या रस्त्याचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे; मात्र नागोठणे, कोलाड, पुई, माणगाव येथील प्रमुख पुलांचे काम अद्याप वेग धरू शकलेले नाही. पळस्पे ते इंदापूर हा ८४ किलोम ीटरचा रस्ता सर्वांत तापदायक होता. याचे दोन टप्प्यांत विभाजन केल्यानंतर पळस्पे ते कासूपर्यंत काम पूर्ण होत आले आहे; मात्र त्यानंतरचे काम अनेक ठिकाणी ठप्प आहे.

त्यामुळे नव्याने सत्तेत आलेले महायुती सरकार तरी महामार्गाकडे गांभीर्याने लक्ष देईल, अशी अपेक्षा प्रवासी तसेच वाहनचालकांकडून व्यक्त होत आहे. पळस्पेपासून माणगावपर्यंत पूर्ण झालेल्या मार्गाच्या दुभाजकामध्ये शोभेची झाडे लावण्यात आली आहेत.

काही ठिकाणी दिशादर्शक फलक लावून काम पूर्ण होत असल्याचे दाखवण्यात येत आहे; मात्र वडखळपासून कशेडी खिंडीपर्यंत महामार्गाची पाहणी केली असता प्रमुख पुलांचे काम २० टक्केही पूर्ण झाले नसल्याचे दिसून येत आहे.

या उड्डाणपुलांसाठी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव करावा लागणार आहे, तर काही पुलांचे काँक्रिटीकरण काढावे लागणार आहे. जुन्या आराखड्यानुसार हे काँक्रिटीकरण झाले असून आताच्या वाढलेल्या वाहतुकीला ते अडथळ्याचे ठरत आहे.

या उड्डाणपुलाच्या कामाला वेळ लागेल, याचे स्पष्टीकरण मध्यंतरी माजी सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी जाहीर भाषणात केले होते. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गाचे काम कधी पूर्ण होणार याकडे कोकणवासीयांचे लक्ष लागले आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम २०१० पासूनच सुरू आहे. ठेकेदारांच्या निष्काळजीमुळे महामार्गाचे काम रखडले आहे. काम पूर्ण होण्यासाठी स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी आंदोलने केली आहेत. मार्गामुळे दळणवळणालाही मोठा फटका बसत आहे. सुरुवातीला मुंबई-गोवा महामार्ग हा बीओटी तत्त्वावर बांधला जाणार होता; मात्र निधी उपलब्ध मिळूनही दोन-तीन ठेकेदारांनी पळ काढल्याने महामार्गाचे काम रखडले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या मंत्र्यांनीही मार्गाबाबत अनेकदा खंत व्यक्त केली आहे.

माणगाव बायपासचे काम न केल्याने चेतक कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आचारसंहितेनंतर बायपासच्या कामासाठी निविदा काढल्या जाणार होत्या. माणगावच्या दुतर्फा रस्ता तयार करणे गरजेचे आहे. तिथे १०० वॉर्डन्स लावण्यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सांगितले आहे. त्याच्या पुढच्या रस्त्याचे काम एलएनटीकडे असून बहुतांश काम पूर्ण झाले आहे.

> **इंदापूरपर्यंत रस्ता मार्चपर्यंत पूर्ण होईल, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. या ८४ किलोमीटर मार्गातील १० किलोमीटरचे काम शिल्लक आहे. हे काम प्रगतिपथावर आहे. आमटेम, नागोठणे, कोलाड, पुई आणि पुढे इंदापूर येथील काही टप्प्यांचा समावेश आहे. रस्त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.**
> – यशवंत घोटकर, प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण.

# आज चौल दत्तटेकडीला परिक्रमा

## नवनाथ आरती मंडळ, चौलचा उपक्रम

**। चौल । प्रतिनिधी ।**

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा.. या दत्तनामाच्या जयघोषात चौल-भोवाळे येथील दत्त टेकडीला उद्या गुरुवारी (दि. १२) परिक्रमा घालण्यात येणार आहे. परिक्रमेचे हे तिसरे वर्ष आहे. ढोलताशाच्या गजरात दुपारी दोन वाजता या सोहळ्यास प्रारंभ होईल, अशी माहिती नवनाथ आरती मंडळ, चौलच्यावतीने देण्यात आली आहे.

चौल पर्वतनिवासी दत्तमंदिराला १०८ प्रदक्षिणा घालण्याचा सोहळा नुकताच या मंडळाच्या माध्यमातून मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या गुरुवारी दि. ५ डिसेंबर रोजी उत्साही आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. या प्रदक्षिणा सोहळ्यास चौल पंचक्राशितील शेकडो दत्तभक्त टेकडीवर उपस्थित होते. प्रत्येकाच्या मुखातून फक्त दत्तनामाचा जप होत होता. त्यामुळे संपूर्ण परिसर दिगंबराच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. दरम्यान, या प्रदक्षिणेच्या यशस्वी आयोजनानंतर उद्या गुरुवारी (दि. १२) दुपारी दोन वाजता दत्त परिक्रमा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्त मंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे, आशिष वासुदेव, सचिन राऊत, निकेश घरत आणि नवनाथ आरती मंडळ, चौलचे सभासद मेहनत घेत आहेत. तरी, दत्त परिक्रमा सोहळ्यास मोठ्या संख्येने दत्तभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आरती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. परिक्रमा सोहळ्याच्या अधिक माहितीसाठी निकेश घरत ८३०८७००८३० यांच्याशी संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### महाआरतीने परिक्रमेची सांगता

दत्त परिक्रमा पूर्ण करण्यासाठी जवळपास तीन तासांहून अधिकचा कालावधी लागतो. दत्त महाराजांच्या पालखीचे मंदिरात प्रस्थान झाल्यानंतर महाआरती होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर परिक्रमा सोहळ्याची सांगता होणार आहे.

### असा असेल परिक्रमेचा मार्ग

संपूर्ण दत्त डोंगराला प्रदक्षिणा घालण्यात येणार असून, पायी पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. परिक्रमेस दुपारी दोन वाजात मंदिरातून प्रारंभ होईल. स्वामी समर्थ मंदिरमार्गे चौल-सराई अशी मार्गक्रमणा करीत दत्त मंदिर मुख्य प्रवेशद्वार व त्यानंतर पायरी मार्गाने मंदिराकडे मार्गस्थ होईल. याची दत्तभक्तांनी दखल घ्यावी, असे आवाहन नवनाथ आरती मंडळाच्या प्रमुखांनी केले आहे.



### शनिवारपासून यात्रेस प्रारंभ

चौल-भोवाळे येथील दत्तयात्रा शनिवार, दि. १४ ते बुधवार, दि. १८ डिसेंबर अशी पाच दिवस भरणार आहे. त्यानिमित्त शनिवार, दि. ७ डिसेंबरपासून दत्तमंदिरात अखंड हरिनामास प्रारंभ झाला असून, पंचक्रोशितील अठरा गावे या सप्ताहात सहभागी होत असतात.

# मोफत रक्त तपासणी शिबीर

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

भारती सोनोग्राफी सेंटर अलिबाग यांच्या वतीने स्वर्गीय भारती विद्युत शहा यांच्या १५ व्या स्मृतीप्रित्यर्थ राजिप शाळा सागाव अलिबाग येथे मोफत रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवार ता १० डिसेंबर रोजी करण्यात आले होते.

या रक्तगट तपासणी शिबिरात शाळेतील २५ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला त्यामुळे शिक्षिका सुप्रिया पिंगळे,रसिका शिरकुळे यांनी विशेष आभार व्यक्त केले.भारती डायग्नोस्टिक्स केंद्राचे सर्वेसर्वा डॉ. निमिष शहा यांच्या सहकार्याने राकेश थळे, भाग्यश्री म्हात्रे, सानिका सकपाळ, साहिल थळे या सर्व टीमने हे शिबीर यशस्वीपणे संपन्न केले.

# उरण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची परवड

## गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी





● (संग्रहीत छायाचित्र)

**। उरण । वार्ताहर ।**

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर उरण रेल्वेसेवा सुरू झाली. त्यामुळे उरणकरांचा प्रवास अतिजलद झाला आहे. त्यामुळे प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे; मात्र लोकल फेऱ्यांची संख्या कमी असल्याने उरणकरांची परवड होत आहे. त्यामुळे लोकलच्या फेऱ्या निदान सकाळी व संध्याकाळी तरी वाढवून मिळाव्यात, अशी मागणी प्रवासीवर्गाकडून करण्यात येत आहे.

उरणकरांना प्रतीक्षा असलेली उरण ते नेरूळ, तसेच उरण ते बेलापूर लोकल रेल्वे १२ जानेवारी २०२४ उरणकरांच्या मागणीनुसार सुरू झाली. उरण- नेरूळ व उरण-बेलापूर लोकल ट्रेन सुरू झाल्याने उरणकरांचा पनवेल, नवी मुंबई ते मुंबई प्रवास जलद झाला, तर उरणचा औद्योगिक विकास झाल्याने नोकऱ्यांची संख्या वाढली आहे.

उरण लोकलने उरण शहराव्यतिरिक्त केगाव, नागाव, बोकडविरा, फुंडे, मुळेखंड, चाणजे, पाणजे, बालई, करंजा त्याचबरोबर उरण पश्चिम विभाग व पूर्व विभागातील गावे, टाउनशिप, द्रोणागिरी नोड अशा कित्येक भागांतील नागरिक मोठ्या प्रमाणावर लोकलने प्रवास करू लागले आहेत; मात्र लोकलची संख्या कमी असल्याने उरणकरांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.


उरण येथून बेलापूर आणि नेरूळ अशी अर्ध्या तासाला लोकल धावत आहे. तर, बेलापूर आणि नेरूळ येथून एका तासाने लोकल उरणकरिता सुटत आहेत; मात्र प्रवासी संख्या पाहता लोकलच्या फेऱ्या वाढविण्यात याव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

गर्दीच्या वेळी अपुऱ्या लोकल फेऱ्यानेरूळ- खारकोपर- उरण-नेरूळ अशा एकूण २० लोकल धावत आहेत. त्यातील अप मार्गावर १० आणि डाउन मार्गावर १० लोकल धावत आहेत. बेलापूर सीबीडी-खारकोपर आणि उरण-बेलापूर सीबीडी अशा २० फेऱ्या सुरू आहेत. तर, उरण ते बेलापूर-नेरूळ मार्गावर गर्दीच्या वेळी अर्ध्या तासाने ट्रेन धावत आहेत. तर, गर्दी नसलेल्या वेळी दर एका तासाला लोकल सुटत आहेत; मात्र नागरिकांची संख्या पाहता व उरण लोकल रेल्वेला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता गर्दीच्या वेळी निदान १५ मिनिटाला एक लोकल व गर्दी नसेल तेव्हा अर्ध्या तासाला एक लोकल अशा लोकलच्या फेऱ्या वाढविण्यात याव्यात, अशी मागणी उरणकरांकडून करण्यात येत आहे.

लोकल ट्रेनसाठी अर्धा ते पाऊण तास थांबणे परवडण्यासारखे नाही, त्यामुळे लोकलच्या फेऱ्या उरण स्थानकादरम्यान वाढवाव्यात, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

> **सध्या तरी तूर्तास उरण-बेलापूर व उरण-नेरूळ मार्गावरील लोकलच्या फेऱ्या नक्की वाढतील की नाही, हे सांगणे कठीण आहे.**
> – पी.डी. पाटील, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे.

# जानेवारीत मिळणार ग्रंथालयांना अनुदान



**। रायगड । प्रतिनिधी ।**

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी जिल्ह्यातील सार्वजनिक वाचनालयांना सरकारी अनुदान दिले जाते. चालू आर्थिक वर्षाचा दुसरा हप्ता जानेवारीत दिला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यात अनेक जुनी सार्वजनिक वाचनालये आहेत. बदलत्या काळानुसार या वाचनालयांनी आधुनिकीकरण केले असून, जिल्ह्यातील ६१ पैकी बहुतांश वाचनालये संगणकीय झाली आहेत. सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानातून वाचनालये नवीन पुस्तके, वृत्तपत्र खरेदीची बिले अदा करतात.

रायगड जिल्ह्यात १५ तालुक्यांत सार्वजनिक वाचनालयांसह एकूण ६१ शासनमान्य वाचनालये व ग्रंथालयांना दरवर्षी देण्यात येणाऱ्या अनुदानापैकी ५० टक्के अनुदानाचा पहिला ८२ लाख ५० हजार ३२५ रुपयांचा हप्ता देण्यात आला आहे. दुसरा ८२ लाख ५० हजार ३२५ रुपयांचा हप्ता येत्या जानेवारीअखेरीस अदा करण्यात येणार असल्याची माहिती रायगड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी दिली आहे.

जिल्ह्यात सर्वाधिक १२ शासनमान्य सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालये पनवेल तालुक्यात आहेत. उर्वरित अलिबाग तालुक्यात आठ, उरणमध्ये पाच, कर्जतमध्ये सात, खालापूरमध्ये दोन, पेणमध्ये दोन, पोलादपूरमध्ये दोन, महाडमध्ये पाच, माणगावात पाच, मुरुडमध्ये तीन, म्हसळ्यात एक, रोह्यात दोन, श्रीवर्धनमध्ये तीन, सुधागडमध्ये दोन शासनमान्य सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालये असून, वाचन चळवळ वृद्धिंगत करण्याकरिता विविध उपक्रमांचे आयोजन अखंड सुरू असल्याचे पवार यांनी सांगितले.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयांमध्ये शहाबाज (१९१६), अलिबाग (१९१७), रोहा(१९१७),श्रीवर्धन(१८९३), पाली(१९०६)येथीलग्रंथालयांचा समावेश आहे. जिल्ह्याच्या सांस्कृतिक जडणघडणीची ही सार्वजनिक वाचनालये केंद्रबिंदू आहेत. जिल्ह्यातील अनेक चळवळींचे साक्षीदार असलेल्या या वाचनालयांना बळकटी देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

> **काळाप्रमाणे बदलत जिल्ह्यातील बहुतेक सर्व ग्रंथालयांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. परिणामी वाचकांना पुस्तक घेणे-देणे प्रक्रियेतील वेळेची मोठी बचत होत आहे. सर्व वाचनालयांमध्ये वृत्तपत्र वाचनाकरिता येणारा वाचकवर्ग मोठा आहे. ही वाचन संस्कृती अशीच वाढावी, यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरु आहेत.**
> – अजित पवार, रायगड जिल्हा ग्रंथालय, अधिकारी.

# महाड बाजारपेठेत दुकान फोडण्याचा प्रयत्न

**। महाड । वार्ताहर ।**

शहरातील विविध भागांमध्ये वर्षभरापासून चोऱ्यांचे सत्र वाढत आहे. काही दिवसांपूर्वी रायगड रस्त्यावर गोंडाळे गावाच्या हद्दीत सहा फ्लॅट चोरट्यांनी फोडल्यानंतर सोमवारी (ता. ९) रात्री दोनच्या सुमारास बाजारपेठेतील एक दुकान फोडण्याचा प्रयत्न चोरट्याने केल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले आहे. यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाड शहरातील बाजारपेठेमध्ये हुतात्मा, अर्जुन भोई कानू कडू चौकात असलेल्या एका तंबाखू दुकानात रात्री दोनच्या सुमारास चोरट्याने कटावणी लावून दुकानाचे शटर उघडण्याचा प्रयत्न केल्याचे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले. रात्री गस्त फेरीसाठी पोलिसांची गाडी त्या परिसरातून गेल्याचेही फुटेजमध्ये दिसत आहे. चोरट्यांनी केलेले प्रयत्न असफल ठरल्याचे सकाळी दुकान उघडण्यासाठी आलेल्या मालक व कामगाराच्या निदर्शनास आले. घटनेचे गांभीर्य ओळखून महाड पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली व सीसीटीव्हीच्या माध्यमातून यासंदर्भात पुढील तपास करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. आठ दिवसांपूर्वीच नातेखिंड परिसरात सहा बंद घरे फोडण्याचा प्रकार घडल्यानंतर मुख्य बाजारपेठेतील दुकान फोडण्याच्या प्रकारामुळे महाड शहरात चोरट्यांची टोळी कार्यरत असल्याचे उघड झाले आहे.

# नागोठणे ते शिर्डी पदयात्रा पालखी सोहळा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यातील श्री साईबाबा भक्तांकडून काही वर्षांपूर्वी स्थापन करण्यात आलेल्या श्री साई सेवक मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १३ व्या नागोठणे ते शिर्डी पालखी पदयात्रा सोहळ्याला बुधवारी(दि.११) सकाळी ८ वाजता नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता, व्याघ्रेश्वर व भैरवनाथ महाराजांचे दर्शन घेऊन श्री जोगेश्वरी माता मंदिरापासून सुरुवात झाली. या पदयात्रा पालखी सोहळ्यात नागोठण्यातील साईभक्त बहुसंख्येने सहभागी झाले आहेत.



ही पालखी येथील गवळआळी भागांत असलेल्या श्री राधाकृष्ण, साई मंदिरात दर्शनासाठी नेण्यात आली. तेथे साई मंदिर देवस्थानचे अध्यक्ष विलास चौलकर, डॉ. मिलिंद धात्रक व देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी पालखीचे आणि श्री साई सेवक मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी विलास चौलकर, श्वेता विलास चौलकर, मधुकर चौलकर, संतोष चितळकर, संतोष नागोठणेकर, दिनेश घाग,विठ्ठल खंडागळे, श्रीधर नागोठणेकर, किरण काळे, राजेश पिंपळे, जगदीश चौलकर, शेखर जोग आदींसह श्री साई सेवक मित्रमंडळाचे पदाधिकारी व गवळआळीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

साई मंदिरात दर्शन घेतल्यानंतर हा पदयात्रा व पालखी सोहळा गांधी चौक, कोळीवाडा, बाजारपेठ मार्गे येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात नेण्यात आला. याठिकाणी अनेक मान्यवरांनी या पालखीचे स्वागत करुन दर्शन घेतले. पालखीला निरोप देण्यासाठी नागोठण्यातील अनेक मान्यवर व ग्रामस्थ बहुसंखेने सहभागी झाले होते. त्यानंतर हा पदयात्रा-पालखी सोहळा पुढे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्गे महामार्गावरून पालीकडे मार्गस्थ झाला.

श्री साई सेवक मित्रमंडळाचा नागोठणे ते शिर्डी पदयात्रा सोहळ्याचे हे १३ वे वर्ष आहे. हा पदयात्रा व पालखी सोहळा २० डिसेंबरला शिर्डी येथे साईबाबांच्या दरबारी पोहोचणार आहे. २२ डिसेंबरला पदयात्रेत सहभागी झालेले साई भक्त नागोठणे येथे परतणार आहेत. त्यानंतर २५ डिसेंबरला सायंकाळी सात वाजता ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या भव्य पटांगणात साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

हा नागोठणे ते शिर्डी पदयात्रा सोहळा यशस्वी होण्यासाठी श्री साई सेवक मित्रमंडळाचे शंकर भालेकर, मच्छिंद्र साळुंखे, मनोज भोसले, विशाल खंडागळे आदि पदाधिकाऱ्यांसह मंडळाचे सदस्य तसेच पदयात्रेत सहभागी झालेले सर्व साई सेवक मेहनत घेत आहेत.

# फरार आरोपी रायगड पोलिसांच्या स्वाधीन

## महामार्ग पोलिसांनी सापळा रचून केली अटक

**। छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील दिघीसागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत जमीन खरेदी-विक्री प्रकरणात चार कोटींची फसवणूक करुन गेल्या दहा महिन्यापासून पसार असलेल्या आरोपीला महामार्ग पोलिसांनी अखेर ताब्यात घेत रायगड पोलिसांच्या स्वाधीन केले. ११ डिसेंबरला दुपारी समृध्दी महामार्गावर ही कारवाई करण्यात आली. महेश प्रल्हाद भोगावे (३५ रा. कात्रज, पुणे) असे आरोपीचे नाव असून बनावट कागदपत्राआधारे जमिन विक्री केल्या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल आहे.

दिघी सागर पोलीस ठाण्यात २७ मार्चला पुणे येथील बिल्डर राजकुमार अग्रवाल यांनी तक्रार दाखल केली आहे. यामध्ये त्यांची श्रीवर्धन तालुक्यातील जमिनीचे बनावट कागदपत्र तयार करुन महेश भोगावे यानी ती परस्पर विक्री केली होती. यामध्ये साडेतीन ते चार कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यापासून भोगावे पसार होता. ११ डिसेंबरला दिघी सागर येथील एपीआय हनुमंत शिंदे यांनी महामार्ग पोलिसांशी संपर्क साधला होता. यामध्ये पसार आरोपी महेश भोगावे हा समृध्दी महामार्गाने लाड, कारंजा मेहकरुवरुन निघाला असून पुणे येथे जात असल्याची माहिती दिली होती. या माहितीवरुन महामार्ग पोलिसांनी सावंगी इंटरचेंजवर सापळा रचला होता.

कारमध्ये येत असलेल्या आरोपी भोगावे याला संशय येऊ नये म्हणुन वाहन तपासणी सुरु असल्याचा दिखावा करण्यात आला. भोगावे असलेली कार जालन्याकडून आल्यानंतर ती तपासणीच्या बहाण्याने अडवण्यात आली. भोगावे याला खाली उतरवून त्याची चौकशी करीत खात्री पटल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले आणि रायगड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधिक्षक रुपाली दरेकर, सचिन कापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक काकासाहेब नागवे, बलभीम गोरे, प्रकाश मोहिते, किशोर घुगे, सुनिल काकड आदींनी केली.

## खवय्यांना थंडीत पोपटीची लागली चाहुल

# बाजारात वालाच्या शेंगा उपलब्ध

**। सुकेळी । वार्ताहर ।**

यावर्षी डिसेंबरच्या सुरुवातीलाच पुण्यावरून बाजारात वालाच्या शेंगा येण्यास सुरुवात झाली असुन खवय्यांना पोपटीची चाहुल लागली आहे. त्यामुळे सर्वत्र यावर्षीच्या हंगामातील वालाच्या शेगांच्या पोपट्यांना सुरूवात झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. खरंतर दरवर्षी थंडीची सुरुवात झाल्यानंतर खवय्यांना पोपटीची ओढ लागत असते.

मात्र यावर्षी डिसेंबरच्या सुरुवातीलाच बाजारात पुण्यातील वालाच्या शेंगा येण्यास सुरुवात झाली आहे. सध्या नागोठणे बाजारात वालाच्या शेंगांची आवक ही मोठ्या प्रमाणात असुन शेंगा खरेदीसाठी खवय्यांची झुंबड उडाली आहे. या शेगांना किलोमागे ७० ते ८० रु. दर आकारला जात आहे. अद्याप गावठी वालाच्या शेंगा होण्यासाठी काही महिने लागणार असुन सद्यपरिस्थितीत पोपटी शौकीनांनी बाजारात मिळणाऱ्या वालाच्या शेंगांना महत्त्वपूर्ण प्राधान्य दिले आहे.

दरम्यान जिल्ह्यात मातीत पिकविल्या जाणाऱ्या चवदार टपोऱ्या दाण्यांच्या गावठी शेगांच्या पोपटीलाच अधिक पसंती आहे. मात्र अवकाळी पावसामुळे नुकसान आणी सध्या रायगड जिल्ह्यातील वालाच्या शेंगा तयार झाल्या नसल्याने पुण्यावरून आलेल्या शेगांवर सध्या समाधान मानावे लागत आहे.



**पोपटीसाठी लागणारे साहित्य: वालाच्या शेंगा, कांदे, बटाटी, मांसाहारीसाठी मसाले लावलेले चिकण, अंडी, ओवा, जाडे मीठ, भामुर्डीचा पाला, मडके किंवा पत्र्याच्या डब्यातही पोपटी लावता येते.**

# काहीही बदललेले नाही

विधानसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी नम्र झाल्याचा आव आणला. विरोधकांची संख्या कमी असली तरी आपण त्यांचा सन्मान करू असे ते म्हणाले. विरोधकांना माफ केले, हाच आपला बदला असे नाट्यपूर्ण उद्गार त्यांनी काढले. प्रत्यक्षात या सरकारची नियत व नीती अजिबात बदललेली नाही. विधानसभेच्या तीन दिवसांच्या अधिवेशनात याचा पुरेपूर प्रत्यय आलाच. शिवाय, मारकडवाडीमध्ये ज्या रीतीने शरद पवार व इतर विरोधकांचा उद्धार चालू आहे ते पाहता या सरकारचा विद्वेषी स्वभाव बदलणार नाही याची साक्ष मिळते. अधिवेशनात राहुल नार्वेकर यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे. त्या जोरावर ते कोणाचीही निवड करू शकतात हे खरेच आहे. मात्र नार्वेकरांची निवड ही एका अर्थाने विरोधकांना इशाराच आहे. याच नार्वेकरांनी गेल्या शिवसेना व राष्ट्रवादीच्या पक्षफुटीच्या प्रकरणात अत्यंत आक्षेपार्ह भूमिका बजावली होती. शिवसेनेच्या फुटीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयाने नार्वेकरांकडे सोपवले तेव्हा दोन महिने त्यांनी त्यावर काहीही कारवाई केली नव्हती. त्यावर एकही सुनावणी घेतली नव्हती. नंतर जेव्हा न्यायालयाची पुढची तारीख जवळ आली तेव्हा घाईघाईने सुनावणीचे नाटक करण्यात आले. याच रीतीने पूर्ण सुनावणीत वेळ काढण्यात आला. या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने एकदा त्यांना झापले. हा सर्व पोरखेळ चालू आहे का अशा आशयाची विचारणा त्यांना केली. वास्तविक विधानसभेचा अध्यक्ष हे वैधानिक पद आहे. न्यायाधीश अशा कोणत्याही पदांबाबत सावधपणे टीकाटिपण्णी करत असतात. नार्वेकर यांच्यावर मात्र न्यायालयाने कडक ताशेरे ओढले. अंतिमतः नार्वेकरांनी या दोन्ही पक्षांच्या फुटींबाबत जो निकाल दिला तो शिंदे सरकारला वाचवणारा व पक्षपाती वाटावा असा होता. त्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील केले गेले आहे. ते दाखल करून घेताना नार्वेकरांचा निकाल प्रथमदर्शनी पटणारा वाटत नाही असे मत न्यायालयाने व्यक्त केले होते.

### यांनी प्रतिष्ठा घालवली

शिवसेनेतील फुटीच्या प्रकरणात निकाल देण्याच्या आदल्या दिवशी हेच नार्वेकर तेव्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटायला गेले. वास्तविक वैधानिक पदांच्या प्रतिष्ठेचा विचार करता अध्यक्षांनी मुख्यमंत्र्यांना भेटायला जाणे हे गैर आहे. खूप पूर्वी लोकसभेचे पहिले सभापती दादासाहेब मावळंकर होते. त्यावेळी भेटायचे असल्यास पंडित नेहरू मावळंकर यांच्याकडे जात असत. इथे नार्वेकर उठून शिंद्यांकडे गेले. तेही त्यांच्यासंबंधीचा एक महत्वाचा निर्णय द्यायचा असताना. शिवाय, या भेटीचे कारण त्यांनी असे सांगितले की, एक आमदार म्हणून आपल्या मतदारसंघातील काही गोष्टींची चर्चा करण्यासाठी आपण गेलो होतो. अशी चर्चा करण्यासाठी नार्वेकर नंतरही जाऊ शकले असते किंवा शिंद्यांना बोलावून घेता आले असते. पण तसे झाले नाही. अध्यक्षपदाची सर्व प्रतिष्ठा घालवणारे असे हे नार्वेकर यांचे वर्तन होते. अर्थात, सध्याच्या सत्ताधारी पक्षांच्या राजकीय पातळीला साजेसे असेच हे आहे. शिवाय, नार्वेकर सध्या ज्या पक्षात आहेत त्या भाजपच्या राजकीय संस्कृतीलाही ते धरूनच आहे. केंद्रात भाजपने ओम बिर्ला नावाच्या गृहस्थांना याच रीतीने यंदा पुन्हा लोकसभेचे सभापती केले. हे बिर्ला विरोधकांना अत्यंत पक्षपातीपणे वागवतात हे वेळोवेळी दिसले आहे. विरोधकांनी तशा तक्रारीही केल्या आहेत. राहुल गांधी विरोधी पक्षनेते असूनही त्यांना पुरेसा सन्मान न देणे हे त्यांनी वारंवार केले आहे. राहुल बोलत असताना त्यांच्यावरचा टीव्ही कॅमेरा हटवणे, विरोधी सदस्य बोलत असतील तर त्याच वेळी सभापतींच्या चेहऱ्यावर कॅमेरा ठेवून ते बोलणे कोणालाही ऐकू जाऊ नये अशी तजवीज करणे असे प्रकार सतत घडले आहेत. अजूनही होतात. तिकडे राज्यसभेत जगदीप धनकड नावाचे अत्यंत पक्षपाती गृहस्थ उपाध्यक्ष म्हणून काम करतात. विरोधकांचा आवाज दडपणे हेच त्यांचे काम आहे. त्यामुळेच आता त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव आला आहे.

### पराभूत मानसिकता सोडा

मुद्दा असा की, विधिमंडळ हा एक केवळ दिखाऊ उपचारांचा भाग ठेवणे हे भाजपचे धोरण आहे. राज्य विधिमंडळातही याच धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी नार्वेकर हे एकदम लायक गृहस्थ आहेत. म्हणूनच त्यांची फेरनिवड झाली आहे. शिवसेना ठाकरे गटाने याबद्दल निषेध व्यक्त करीत या निवड कार्यक्रमावर बहिष्कार घातला. आश्चर्य म्हणजे शरद पवार यांच्या पक्षालाही नार्वेकरांच्या निर्णयाचा मोठा फटका बसला आहे. त्यामुळे त्यांनी तसेच महाविकास आघाडीच्या धर्माला अनुसरून काँग्रेसनेही नार्वेकर यांच्या निवडीला विरोध करायला हवा होता. पण ते झाले नाही. उलट या दोन पक्षांच्या नेत्यांनी नार्वेकरांच्या गौरवाची भाषणे केली. हे औपचारिकदृष्ट्या आवश्यक मानले तरी त्यामुळे भाजपच्या उद्दाम धोरणांपुढे ही शरणागतीच होती. ज्या नार्वेकरांनी फुटीच्या खटल्यांमध्ये निर्णायक वेळकाढूपणाची भूमिका अदा केली व नंतर वादग्रस्त निर्णय देऊन प्रकरण चिघळवून ठेवले त्यांनाच आम्ही पुन्हा अध्यक्ष करणार हा भाजपचा हेका यातून स्पष्टपणे दिसतो. विरोधकांची संख्या कमी आहे हे खरे आहे. पण या निर्णयाला त्यांनी एकदिलाने व एकमुखाने विरोध केला असता तर तो सर्व जनतेपर्यंत नक्की पोचला असता. पण आघाडीतील विसंवाद आता इतका टोकाला गेला आहे की, त्यात नार्वेकर व भाजप यांचे चांगलेच फावते आहे. इतक्या कमी संख्येच्या विरोधकांना विरोधी पक्षनेतेपद द्यायचे की नाही हा निर्णय सर्वस्वी नार्वेकरांच्या मनावर अवलंबून आहे. त्यासाठी विरोधक जर त्यांच्या गुड बुक्स मध्ये राहू इच्छित असतील तर ते योग्य नाही. असे करून ते जनतेच्या मनात आपली गेलेली विश्वासार्हता परत मिळवू शकणार नाहीत. उलट विधिमंडळात कमी संख्येने केलेला विरोधही मिडियामार्फत सर्व राज्यात पोचू शकतो. हे लक्षात घेऊन तेथेच विरोधकांनी आपली एकत्रित ताकद दाखवायला हवी व सरकारची जमेल तेथे कोंडी करायला हवी. विरोधकांनी आपली पराभूत मानसिकता बदलली नाही तर सरकारचा उन्मत्तपणाही बदलणार वा थांबणार नाही.

विचार

# पवारांच्या यशस्वी जीवनाचे रहस्य

> *माणसांची पारख आणि गुणग्राहकता अचूक ओळखून देशहिताच्या कामाला जुंपायचे कसब ही शरद पवारांची खासियत आहे. अविरत कष्ट करा, सर्वोत्तम, आधुनिक, फायदेशीर तंत्रज्ञानाला सामान्य माणसाच्या, शेतकऱ्यांच्या हितासाठी वापरा अशी त्यांची कळकळीची शिकवण खूप भावली. गर्व करू नका, पाय जमिनीवर राहू द्या, गरिबांच्या कामास प्राधान्य द्या आणि गुणवंतांना डावलू नका हे त्यांचे तीन 'ग' चे मंत्र आयुष्याचे सोने करून गेले. पवार साहेबांच्या यशस्वी जीवनाचे रहस्य इतक्या सोप्या भाषेत सामावले आहे.*

**डॉ. शंकरराव मगर**



जमीन, पाणी आणि वनस्पती हे तीन शब्द पवार कुटुंबियांमध्ये ब्रम्हा, विष्णू आणि महेश या त्रिमुर्तीसारखे एकरूप झाले आहेत. काही मंडळींनी साहित्य आणि पत्रकारिता तसेच उद्योगक्षेत्रात नाव कमावले. धडाडी, कार्यतत्परता, उच्च कार्यक्षमता आणि परिपूर्ण नियोजन या गुणांच्या आधारे सरस्वती आणि लक्ष्मी यांना एकत्र सहवास करावयास भाग पाडले. त्याचवेळी राजकीय इच्छाशक्तीचा अडथळा येऊ दिला नाही. कुशाग्रबुध्दी आणि तीव्र स्मरणशक्ती याची त्यांनी जाणीवपूर्वक जपणूक केली. किंबहुना आजही करत आहेत. ही शरद पवारांची मुलभूत शक्तीस्थाने आहेत. सतत कार्यरत राहणे आणि कार्यात सातत्यता टिकवणे अशा विरोधाभास वाटणाऱ्या बाबी त्यांच्या अंगवळणी पडल्या आहेत. स्मृतीमध्ये अनेक प्रसंग आणि व्यक्ती असतात. पण चिरस्मृतीमध्ये शरद पवारांसारखे एकच रत्न अद्वितीय वाटले. माझ्याप्रमाणे शरद पवारांच्या जवळच्या बहुतेकांची हीच भावना असावी असे प्रामाणिकपणे वाटते.

स्वच्छ, नितळ, पाण्याच्या पृष्ठभागावरून खोल तळ स्पष्ट दिसतो तशा प्रकारची संपूर्ण पारदर्शक, आरपार मनाला भिडणारी कृषी कारकिर्द पवारांनी शेतकरी आणि जनतेसमोर ठेवली आहे. त्यांच्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक जीवनाचा कृषी आणि त्यावर आधारित मूल्ये हा केंद्रबिंदू अगदी सुरूवातीपासून आजपर्यंत सातत्याने टिकून आहे. खाते कोणतेही असो, पण त्यांच्याभोवती गराडा हा शेतकऱ्यांचा असणार हे निश्‍चित! ते महाराष्ट्राच्या प्रगत शेतीचे आधारस्तंभ आहेत. पण देशाचा कृषीचा कणा म्हणून सारेजण त्यांच्याकडे आदराने पाहत आहेत. कृषीविषयक ज्ञानाचा अथांग सागर, शाश्‍वत शेतीचा महामेरू, सामान्य शेतकऱ्यांच्या गळ्यातील ताईत अशी त्यांची ओळख सर्वांना आहे. राज्य आणि केंद्र स्तरावर काम करताना शेती, शेतकरी आणि शेतीपूरक उद्योगांना नवचैतन्य आणण्यासाठी घेतलेले निर्णय शेतकऱ्यांच्या आणि त्यावर आधारित मनुष्यबळाच्या आयुष्यात इतिहास निर्माण करून गेले. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, कृषी उत्पादनासाठी पतपुरवठा, सिंचन, खाते आणि कृषी विस्तारासाठी प्रस्थापित केव्हीकेची लक्षणिय वाढ इत्यादींचा खास करून उल्लेख करता येईल.

शेतीमध्ये महिलांची भूमिका, त्यांचे सक्षमीकरण हा विषय त्यांनी प्राधान्यक्रमाने हाताळला. सार्वजनिक निधीतून राष्ट्रीय फलोद्यान मिशन (एनएचएम), अन्न प्रक्रिया विभागवार उद्योग, विविध पिकांच्या किफायतशीर किमान आधारभूत बदलत्या किंमती आणि पाच एकरापर्यंतच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी अशा निर्णयांमुळे शेतकरी वर्ग सामान्य स्थितीतून वर आला. अन्नधान्य सुरक्षा, जैव सुरक्षा, जैव तंत्रज्ञान, जागतिक तापमानवाढ, हवामानातील बदल आणि पिकांवर पडणारा अजैविक ताण या विषयावीरल त्यांची रूची शास्त्रज्ञांनाही लाजवेल अशी आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयातील त्यांचा आवाका प्रचंड आहे. याचा अर्थ ते इतर विषयात कमी पडतात असा मुळीच नाही. व्यापार, संरक्षण, अंतर्गत सुरक्षा, कंझुमर्स अ‍ॅफेअर्स, संगणक माहिती-तंत्राज्ञान आणि परराष्ट्र धोरण असे नानाविध विषय त्यांनी सहजपणे हाताळले आहेत. आदरणीय अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांनी आपत्ती व्यवस्थापन गटाचे अध्यक्षपद कुशलतेने सांभाळले तर त्यांनी संरक्षण मंत्री म्हणून केलेले कार्य माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनीही गौरवले आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जगातील विविध राष्ट्रातील प्रमुख नेत्यांबरोबर शरद पवारांचे संबंध आजही टिकून आहेत. केंद्र शासनातील कृषी व्यतिरिक्त मंत्रीगटाचे अध्यक्ष म्हणूनही पंतप्रधानांनी त्यांच्यावर जबाबदारी सोपवली. अशा या जाणत्या नेत्याशी अनेक वर्षांपासूनचा परिचय आहे. आय.आय.टी. खरगपूरहून पी. एच.डी. करून जलव्यवस्थापन प्रकल्पाचा प्रमुख शास्त्रज्ञ झालो. बरोसा व्हॅली, दक्षिण ऑस्ट्रेलियातून आणलेल्या साहित्यावर ठिबकचा देशातील पहिला प्रयोग पद्मश्री आप्पासाहेब पवारांना खूप आवडला. त्यांच्याच हाताची करंगळी पकडून शरद पवारांशी जवळीक साधली. शास्त्रज्ञांचा भोक्ता आणि कृषीक्रांतीचा हा भक्त १९८४ मध्येच आमच्या गळ्यातील ताईत झाला. कृषी शास्त्रात एखादा नवीन शोध लागला किंवा एखाद्या शेतकऱ्याने शेतीत नाविन्य दाखवले की ते अवगत करण्यासाठी प्रथम डॉ. आप्पासाहेब आणि नंतर शरद पवारांची कसरत सुरू व्हायची. 'ठिबक सिंचन तंत्र' हे त्या काळातील प्रगत तंत्र देशात प्रथमच आणले आणि कृषी विकास ट्रस्ट बारामती येथे स्थिर झाले. त्या विषयावर देशातील पहिल्या मराठीतून लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन पवारांच्या हस्ते झाले. तेथूनच आमच्या मैत्रीला सुरूवात झाली. ठिबक सिंचनाला राज्य शासनाचा ५० टक्के सवलतीचा राजाश्रय मिळाला. राज्यस्तरीय ठिबक सिंचन समितीवर सदस्य म्हणून काम करण्याची संधी शरद पवारांमुळेच मिळाली.

१९८४ ते १९९० या कालावधीत शरद पवारांनी ठिबकसंदर्भात अनेक क्रांतीकारी, गुणात्मक आणि संख्यात्मक निर्णय घेतले. ठिबक माल प्रतवारी समितीच्या शिफारशी जशाच्या तशा स्वीकारल्या. पुढे त्यांना इंडियन स्टँडर्स ऑफ ब्युरोंनी मान्यता दिली. कृषी विद्यापीठांच्या पायाभूत सुधारणांसाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेत प्रत्येकी पाच कोटी रूपयांची तरतूद केली. शेतकरी कृषी विद्यापीठात येतात. पण आम्ही त्यांच्या निवासाची सोय करू शकत नाही ही बाब दापोलीच्या कार्यक्रमात लक्षात आणून दिल्याबरोबर शरद पवारांनी देशातील सर्व विद्यापीठांच्या मुख्य ठिकाणी दीड कोटी रूपयांच्या भव्य शेतकरी निवासाच्या उभारणीची घोषणा केली. लगोलग त्याला मंजुरीही मिळाली. नंतर कृषी अनुसंधान परिषदेमार्फत आराखडा, निवासाची सोय, छोटी ग्रंथालये, व्हिडीओ आणि संगणकाद्वारे इंटरनेट सुविधा अशी परिपूर्ण योजना संपूर्ण देशभर राबवली. राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये मुलींसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. पण महिलांसाठी होस्टेल वा अन्य सुविधा उपलब्ध नव्हत्या. ही बाब लक्षात आल्यावर विद्यापीठ परिसरात ३०० मुलींसाठी सर्व सुखसोयी आणि सुविधांनीयुक्त भव्य वसतिगृहांना मंजुरी दिली. पवार साहेबांच्या मार्गदर्शनामुळेच कोकण कृषी विद्यापीठाची चार कोटींची अतिभव्य प्रशासकीय इमारत फक्त १८ महिन्यात उभी राहिली. अद्वितिय गुणवत्ता आणि सर्वोत्तम आराखडा म्हणून या इमारतीचा उल्लेख आजही आवर्जून केला जात आहे.

या कार्याबरोबरच पवार साहेबांच्या मार्गदर्शनातून वेंगुर्ला येथील फलोद्यान संशोधन केंद्राचे आधुनिकीकरण, काजू आणि आंबा फळपिकांच्या विविध जागतिक वाणांचा संग्रह, त्याद्वारे संकरित जातींची निपज ही उद्दीष्टे साध्य करता आली. राजाभाऊ लिमये राष्ट्रीय नारळ बोर्डाच्या सदस्यांच्या मदतीने रत्नागिरी-भाटे येथील नारळ संशोधन केंद्र राष्ट्रीय पातळीवर प्रथम क्रमांकावर आल्याचा पवारांना खूप आनंद झाला. कोकणातील नारळावरील युराफॉईट माईट आणि उत्तर कोकणातील चिकू बागेतील फळावरील बी पोखरणारी अळी यांचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान विद्यापीठ वाचवू शकले यामागे पवारांचा प्रेमयुक्त दराराच कारणीभूत होता. कोकणातील हापूस आंब्याच्या आयातीवर चीन आणि जपानने बंदी आणली होती. ती उठवण्यातही पवारांची भूमिका निर्णायक ठरली.

माणसांची पारख आणि गुणग्राहकता अचूक ओळखून त्याला देशहिताच्या कामाला जुंपायचे कसब ही शरद पवारांची खासियत आहे. अविरत कष्ट करा, सर्वोत्तम, आधुनिक फायदेशीर तंत्रज्ञानाला सामान्य माणसाच्या तसेच शेतकऱ्यांच्या हितासाठी वापरा अशी त्यांची कळकळीची पण प्रेमाच्या धाकाची शिकवण मला खूपच भावून गेली. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीच्या संचालक (शिक्षण) आणि अधिष्ठाता म्हणून निवड ही त्यांच्या मार्गदर्शनाची सुरूवात तर कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरूपद हा माझ्या आयुष्यातील परमोच्च बिंदू होता. गर्व करू नका, पाय जमिनीवर राहू द्या, गरिबांच्या कामास प्राधान्य द्या आणि गुणवंतांना डावलू नका हे त्यांचे तीन 'ग' चे मंत्र माझ्या आयुष्याचे सोने करून गेले.

पवार साहेबांच्या यशस्वी जीवनाचे रहस्य इतक्या सोप्या भाषेत सामावले आहे.आपल्या आजवरच्या वाटचालीत शरद पवारांनी मोठे कार्य केले आहे. सामान्य जनतेसाठी अहोरात्र झटणाऱ्या कार्यकर्त्यांचे, शास्त्रज्ञांचे आणि तंत्रज्ञांचे मोहोळ महाराष्ट्रात निर्माण केले आहे. पवार साहेबांच्या जीवनात अनेक चढ-उतार झाले असतील, यशापयशांचे घुटके पचवावे लागले असतील. ताप-मनस्ताप सहन करावा लागला असेल तर कधी आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागले असेल. पण या सर्वांवर आत्मबलाने मात करणारे साहेब कोट्यवधी जनमानसांच्या गळ्यातील ताईत झाले. शंभर वर्षातून एकदा येणारी १२-१२-२०१२ ही तारीख त्यांच्या आयुष्यातील भाग्योदीन आहे. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आपणा सर्वांना हा परमयोग प्राप्त झाला आहे.

विशेष

# उद्योगपती राजाशेठ हे गरजूंचे आधारवड

**दत्तात्रेय म्हात्रे**



राजाशेठ खारपाटील यांचा जन्म १२ डिसेंबर १९६५ रोजी चिरनेर येथे झाला.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कुठलेही साधन नसताना, कंत्राटदारी क्षेत्रात अवघ्या ३६ वर्षात पी.पी.खारपाटील कंट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कायद्याअंतर्गत नव्या कंपनीमध्ये विलीन करण्यात आली. चिरनेर या ऐतिहासिक भूमीतील हा उद्योजक बघता बघता चिरनेरच्या पंचक्रोशीतील जनतेचा विश्वास संपादन करीत, उरण तालुक्यातील लाडके व्यक्तिमत्व म्हणून उद्योग क्षेत्रात ते प्रसिद्धीस आले आहेत.

बैलगाडीपासून कंत्राटी कामांना सुरुवात केलेल्या या कंपनीने आता अद्यावत अशी परदेशी बनावटीची यंत्रसामग्री पदरी बाळगली आहे. रस्ते बांधकामात जिल्ह्यात दर्जा हे कंपनीचे ब्रीदवाक्य आहे. उरण परिसरात गत दहा-बारा वर्षात कोट्यावरी रुपयांपेक्षा जास्त रस्त्यांची कामे पूर्ण केली आहेत.चिरनेरचे यशस्वी उद्योगपती पी.पी.

खारपाटील यांचे उद्योगपती राजाशेठ खारपाटील हे धाकटे बंधू आहेत. अत्यंत प्रेमळ, मनमिळावू पण मनाला पटेल तेच करणारे, कुटुंबावर जीवापाड प्रेम करणारे, कामाच्या बाबतीत कोणतीच हयगय सहन न करणारे आणि राजा या नावाप्रमाणे सर्वांसाठी राजा माणूस असणारे राजाशेठ हे गरजूंचे आधारवड आहेत. चिरनेर गावावर त्यांचे नितांत प्रेम आहे. आधुनिकता, तत्पर सेवा आणि विनम्रता या आधारे रस्ते बांधकाम व्यवसायात या खारपाटील बंधूंनी आपली अनोखी मोहर उंमटविली आहे. परीणामी व्यवसायाचा वाढलेला प्रचंड आवाका, तरीही त्यातून आपल्या कुटुंबासाठी सदैव उपलब्ध असणारे हे दोन्ही बंधू कुटुंबवत्सल म्हणूनच ओळखले जातात. त्यांच्या एवढ्या मोठ्या कामाच्या व्यापातून, कुटुंबासाठी वेळ देण्याची सहसा न जमणारी कला, या दोन्ही बंधूंना चांगलीच अवगत आहे. त्यांच्यासाठी कुटुंब हे सर्वस्व आहे. उतारवयात त्यांचे आई-वडील ज्यावेळी आजारी होते, त्यावेळी राजाशेठ खारपाटील यांनी आई-वडिलांना दैवत मानून, त्यांची खूप प्रामाणिकपणे सेवा केली. आज त्यांचे आई-वडील हयात नाहीत. चिरनेर विभागातील प्रत्येक व्यक्ती त्यांच्या संपर्कात असून,सर्वांना संघटित करून ते गावातील समस्या सोडविण्यासाठी हवी ती मदत करतात. कंपनीने गावासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यामुळे गावात केलेल्या विकास कामांचा आलेख सर्वांनाच ठाऊक आहे. राजाशेठ खारपाटील यांचा मित्रवर्ग देखील भरपूर आहे. आज त्यांच्याकडे उद्योग, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक आणि शालेय जीवनातील देखील मित्रांचा अफाट संग्रह आहे. सामान्य माणसांचे मन जपणारा आणि ज्येष्ठांच्या सन्मानात जराही कसूर न ठेवणारे, असे संतुलित मनाचे राजाशेठ आहेत. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे. त्यांच्या कामाचा झंझावात अफाट आहे. आणि तो असाच कायम राहील, यात जराही दुमत नाही. आज राजाशेठ खारपाटील यांचा ६१ वा. जन्मदिवस आहे. यानिमित्ताने त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना, मनस्वी आनंद होत आहे. त्यांना उत्तम आरोग्य व आयुष्य लाभो, ही ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

लोकसंसद

## 'बेस्ट' प्रवाशांची सुरक्षितता वाऱ्यावर



मुंबईच्या कुर्ला पश्चिम येथे नुकत्याच झालेल्या बेस्ट बसच्या अपघातात ७ निष्पाप नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ४२ जण गंभीररित्या जखमी झाले. या भीषण बस अपघाताला जबाबदार कोण याची सर्वंकष आणि सखोल चौकशी होईलच, पण या अपघातामुळे बेस्ट प्रशासनाच्या एकूणच कारभारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. एकेकाळी संपूर्ण राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशात अग्रगण्य तंत्रज्ञानाभिमुख सार्वजनिक वाहतूक उपक्रम म्हणून नावलौकिक असलेल्या बेस्ट उपक्रमाचा सद्या पडता काळ सुरु झाला आहे असे वाटते. कारण १ एप्रिल २०२२ ते १० डिसेंबर २०२४ या ३३ महिन्यांच्या कालावधीत बेस्टच्या बसच्या एकूण २४७ अपघातांची नोंद झाली आणि त्यात ६९ जणांचा नाहक बळी गेला, १४५ लोक गंभीर जखमी तर ८२ लोक किरकोळ जखमी झाले. वाढत्या अपघातांसाठी कंत्राटीकरणामुळे भाडे तत्वावरील बसगाड्या, भाडे तत्वावरील अर्ध प्रशिक्षित वाहक-चालक अशी कारणे पुढे केली जात असली तरी त्यामुळे त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, याकडे राज्य शासनाने आणि बेस्ट प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## बेस्ट बस मृत्युवाहिनी ठरु नये

महाराष्ट्राची लालपरी आणि महामुंबईतील बेस्ट बस या सुरक्षित प्रवासासाठीच ओळखल्या जात होत्या. परंतु मागील काही वर्षात ही ओळख वारंवार घडणाऱ्या अपघातामुळे फिकी पडू लागली आहे. भरधाव वेग, जुन्या एसटी बस ही लालपरीच्या महामार्गावरील अपघाताची मुख्य कारणे आहेत तर बेस्ट बसचे अपघातही भरधाव वेगामुळे होत आहेत. परवाच कुर्ल्यात घडलेल्या बस अपघाताबाबत समोर येणारे नवनवीन खुलासे काळजीत टाकणारे आहेत. बसचालक कंत्राटी कामगार असण्यापासून ते अपुरे प्रशिक्षण घेऊन ईलेक्ट्रिक बस चालवण्यापर्यंत वेगवेगळी कारणे या अपघाताबाबत देण्यात येत आहेत. यात भरधाव वेगही कारणीभूत आहेच. बेस्ट बसची वाहतूक कंत्राटदाराच्या हातात गेल्यानंतर सुरक्षित प्रवासाची हमी तशीच राखायला हवी. त्यात हयगय झाल्यास बेस्ट प्रशासनाने कंत्राटदाराला धारेवर धरायला हवे. कारण बहुतांश मुंबईकर अजूनही मुंबईच्या रस्त्यावरील प्रवासासाठी बेस्ट बसलाच प्राधान्य देतो. रस्त्यावरील या जीवनवाहिनीचा मृत्युवाहिनीच्या दिशेने होणारा प्रवास त्यासाठीच बेस्ट प्रशासनाने थांबवायला हवा.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१२ डिसेंबर**

**१८८५ :** - साहित्यिक यशवंत सदाशिव कोरेकल यांचा जन्म. मराठीसह उर्दू, फार्सी, हिंदी या भाषा त्यांना अवगत होत्या. त्यांनी वेदोपनिषदादी ग्रंथांचे सूक्ष्म अध्ययन केले होते. काव्यकुसुमकलिका: प्रथम उद्भव, पुष्पपाकळया: द्वितीय उद्भव आणि सुगम सौरभ: तृतीय उद्भव हे तीन काव्यसंग्रह तसेच विचार वैभव, कौस्तुभ किरण आणि यशोविलास हे तीन गद्य लेखनाचे संग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९०४ :-** लेखक समीक्षक, स्वातंत्र्यसेनानी खंडेराव त्रंबक सुळे यांचा जन्म. त्यांनी शेष या नावाने सुळे यांचा जन्म त्यांनी शेष या नावाने ललित तर स्कंद या नावाने राजकीय स्वरूपाचे लेखन केले. विणा मासिकातून त्यांनी परीक्षणे लिहिली. तसेच तत्कालीन नियतकालिकांमधून त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध शेषसमीक्षा या पुस्तकात त्यांचे टीकालेख समाविष्ट करण्यात आले आहे- **१९११ :** निबंधकार, भाषांतरकार विष्णू कृष्ण भाटवडेकर यांचे निधन निष्णात वकील असा नावलौकिक संपादन करणाऱ्या भाटवडेकरांनी हिंदू युनियन क्लबमध्ये विविध सामाजिक व राजकीय विषयांवर निबंध वाचले. तसेच सयाजीराव गायकवाडांच्या सुचनेवरुन इंग्रजी ग्रंथ 'हिंदू ला' आणि मूळ संस्कृत ग्रंथाच्या आधारे हिंदुधर्मशास्त्र' चे दोन खंडात मराठीत भाषांतर केले. **१९२१ :**-महाराष्ट्र राज्याचे माजी भाषा संचालक यशवंत कानिटकर यांचा जन्म. संचालक या नात्याने भाषाविषयक प्रश्नावर राजभाषा, परिभाषा, अनुवाद, कोशरचना आदी स्वरुपाचे तसेच व्यक्तिचित्रे विषयकही विपुल लेखन कले होते. मराठवाडा साहित्य परिषदेच्या प्रतिष्ठान या मुखपत्राचे तसेच साहित्य संस्कृती मंडळाच्या शब्दकोश प्रकल्पाचेही संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले होते. टिळक स्मारक ट्रस्टतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'लोकमान्य टिळक यांचा भाषाविचार' या ग्रंथाचे संपादनही कानिटकर यानी केले होते. समग्र टिळक खंड-८' चे संपादन, मराठी भाषा-स्वरुप आणि उपाययोजना ते दिवस ती माणसे' (व्यक्तिचित्र), 'मेनका' (काव्यसंग्रह), आज इथे तर उद्या तिथे', 'पश्चिमी वारे' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झाला आहेत **१९२७:**-लेखक ज. रा. फणसाळकर यांचा जन्म. 'एक स्वन वांझोटे', 'नवा संदर्भ', 'सोस', 'दि ब्रेन' ह्या एकांकिकेसह 'पोहा चालला महादेवा', 'कलंक माझा माझे भुषण', 'जे दिवा स्वप्न पाहिले' मिळून १५ हून अधिक नाटके त्यांनी लिहिलीत. **१९४० :** - भूखंड घोटाळ्यापासून दाऊत शी संबंधापर्यंत, एरॉन पासून लवासा पर्यंत आपल्याबद्दलच्या विवादांना अन प्रवादांना थेट भिडणारी राजकीय आत्मकथा लिहिणारे ज्येष्ठ नेते, राजकीय विचारवंत आत्मकथाकार शरद पवार यांचा जन्म. **१९४२:** -लेखिका प्रा. मंदा विजय टेंबे यांचा जन्म. 'निर्मोही' ह्या कथासंग्रहासह त्यांची बालगीते, नाटिका, लघुकथा, ग्रंथपरिक्षण, विविध नियतकालिकांतून प्रसिध्द झाले आहेत. **१९४७:**-कवी शिवाजी धर्माजी साळुंके यांचा जन्म. ह्यांचा 'चाहूल' हा काव्यसंग्रह आणि 'थुई थुई मोरा' हा बालकाव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५९:**-वैद्यकीय व्यवसाय सांभाळून साहित्य निर्मिती करणारे डॉ. चंद्रकांत अर्जुनजी लेनपुरे यांचा जन्म. ह्यांचा 'चंद्रगीत', 'वनव्यातील झाडे' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९६९ :** - लेखक बंडोपंत राजेश्वरजी बोढेकर यांचा जन्म. ह्यांचा 'खंजरी' हा काव्यसंग्रह. 'ग्रामगुरु' हे चरित्र आणि 'झाडीपट्टी' नाटय गौरवांक, रा. विचारकृती गौरवांक, राष्ट्रसंत गौरव विशेषांक अशी साहित्य संपदा. **२००२:** -लेखक, विचारवंत, संपादक, अनुवादक विश्वास रघुनाथ पाटील यांचे निधन. दीपावली , विवेक, ललित यातून त्यांचे लेख प्रसिद्ध विज्ञान तत्वज्ञान समाजशास्त्र, मानसशास्त्र इतिहास या विषयांवरचे गंभीर आणि तत्त्व चर्चा करणारे त्यांचे लेख गाजले. अनुवादित स्वरूपात त्यांचे लेखन मोठ्या प्रमाणात आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१२ डिसेंबर**

१) श्री. बळवंत पांडुरंग वालेकर ब्राह्मणआळी, अलिबाग १२-१२-१९४४

२) श्रीम.ज्योत्स्ना दिनेश पारेख, थळ आगार, पो.थळ १२-१२-१९५०

३) श्री. दत्तात्रेय हरिश्चंद्र राऊत चोंढी,अलिबाग १२-१२-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**




स्व. प्रभाकर मुकुंद बारटक्के, जन्म दिन, अलिबाग



अमृतबेन प्रेमजी जैन, स्मरणार्थ अलिबाग

# महाराष्ट्रातील वीज सर्वात महाग

## जयंत पाटील यांचा सरकारला टोला



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी देशामध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक वीज महाग असल्याचा दावा केला आहे. त्यांनी अन्य राज्यातील वीज दरांची आकडेवारी मांडली आहे. मोफत वीज देणार असे म्हणणारे आज प्रचंड बहुमताने सत्तेत बसले आहेत. सध्या राज्यात असलेले अवाढव्य वीजदर कमी करण्यात आता सरकारला कोणतीही अडचण नसावी, असा उपरोधिक टोलाही सोशल मीडियावरील पोस्टमध्ये जयंत पाटील यांनी महायुती सरकारला लगावला आहे.

जयंत पाटील यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे की, वीज बिलात ३०% कपात करणार असे महायुती सरकारमधील लोकं मागच्या ४-५ महिन्यांपासून म्हणत आहेत. ३०% कपात सोडाच पण इतर राज्यांपेक्षा आपल्या महाराष्ट्रात सध्या वीज महाग मिळत आहे. राजस्थानमध्ये प्रति युनिटला ७.५५-८.९५ रुपये मोजावे लागत आहेत. तर, मध्य प्रदेशमध्ये ३.३४ ते ६.८० रुपये मोजावे लागत आहेत. शेजारच्या कर्नाटक राज्यात तर सरसकट प्रति युनिट ५.९० रुपये आहेत. सर्वात जास्त वीजदर म्हणजे प्रति युनिट ५.१६ ते १७.७९ रुपये महाराष्ट्रात मोजावे लागत आहेत. वीज बिलात ३०% कपात करणार, पाच वर्षे शेतकऱ्यांना मोफत वीज देणार, असे म्हणणारे आज प्रचंड बहुमताने सत्तेत बसले आहेत. सध्या राज्यात असलेले अवाढव्य वीजदर कमी करण्यात आता सरकारला कोणतीही अडचण नसावी, असे पोस्टमध्ये म्हटले आहे.

### सरकारने गांभीर्याने विचार करणे आवश्यक

गेल्या काही वर्षांत वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे वास्तविक उत्पन्न कमी झाले आहे. पुरेसे रोजगार उपलब्ध नाहीत. उद्योग आणि उत्पन्नाच्या संधी नाहीत. परिणामी सर्वसामान्य जनतेला आपल्या दैनंदिन गरजा भागविणेही अडचणीचे झाले आहे. सध्या लागू असलेल्या इंडस्ट्रीयल वीज दरामुळे राज्यातील अनेक छोटे औद्योगिक घटक अडचणीत आलेले आहेत. अनेक उद्योगांमध्ये वीज हा महत्वाचा कच्चा माल असतो. त्याचबरोबर राज्यामधील अनेक उद्योग देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक बाजारपेठेमध्ये टिकू शकत नाहीत. महावितरण आणि राज्य सरकार यांनी गांभीर्याने विचार करणे अत्यंत आवश्यक असल्याचे महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेने अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी सांगितले होते.

# मविआ निकालाविरोधात याचिका दाखल करणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. मात्र, अनेकांनी या निकालावरुन संशय व्यक्त केला आहे. महाविकासआघाडीच्या अनेक नेत्यांनी या निकालानंतर ईव्हीएममध्ये फेरफार केल्याचा आरोप महायुतीवर केला आहे. त्यातच आता मविआने एक मोठा निर्णय घेतला आहे. मविआ विधानसभा निकालाबद्दल सर्वोच्च न्यायालयात धाव घेणार आहे. लवकरच मविआकडून याबद्दल एक याचिका दाखल केली जाणार आहे.

विधानसभेत झालेल्या पराभवानंतर महाविकासआघाडीकडून ईव्हीएमवर आक्षेप घेतला जात आहे. अनेक नेत्यांनी ईव्हीएमला विरोध करण्यास सुरुवात केली आहे. महाविकासाआघाडीकडून बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया घेतली जावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. तसेच, याविरोधात याचिका दाखल करावी, अशी मागणी होत होती. अखेर यासंदर्भात राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत महाविकासआघाडीकडून आणि विधानसभा निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# शिंदेंच्या शिवसेनेत धुसफूस



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन झाल्यानंतर महायुतीला आता मंत्रिमंडळ विस्ताराचे वेध लागले आहे. भाजपसह शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजितद पवार गट) यांच्या मंत्र्यांची यादी दिल्लीतून निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची धाकधूक वाढली आहे. परंतु, शिंदेंच्या शिवसेनेतील काही आमदारांनी सहा जणांना मंत्रिपद देण्यास विरोध केल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेतच धुसफूस असल्याचे समोर आले आहे.

माजी मंत्री तानाजी सावंत, दीपक केसरकर, अब्दुल सत्तार, दादा भुसे, गुलाबराव पाटील आणि संजय राठोड यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी मिळू शकते. परंतु, याच सहा नेत्यांच्या नावाला शिवसेनेतील आमदारांकडूनच विरोध होत आहे. या नेत्यांकडे गेल्यावर कामच होत नाहीत. हे नेते केवळ आश्वासने देतात. प्रत्यक्षात काम होत नसल्याचा आरोप आमदार खासगीत करतात, अशी माहिती समोर येत आहे. तसेच, माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या नावाला देखील शिवसेनेसह भाजप आमदारांचाही विरोध असल्याची माहिती समोर येत आहे.

# पडळकरांच्या टीकेवर बावनकुळेंची सावरासारव



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भाजप आ. गोपीचंद पडळकर यांच्या शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेला विरोध करत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सावरासावर करत त्यावर निषेध व्यक्त केला आहे.

गोपीचंद पडळकर यांनी मारकरवाडी येथील एका सार्वजनिक कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर तीव्र टिप्पणी केली होती. त्यांनी म्हटले होते की, १०० शकुनी मेले तेव्हा शरद पवार जन्माला आले. दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे यांनी सावरासावर करत या टीकेला विरोध करत शरद पवार यांना मान्यवर नेते म्हणून सन्मान देण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शरद पवार हे एक अत्यंत सन्माननीय नेते आहेत आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर अशा प्रकारच्या टीका भाजपला स्वीकार्य नाहीत. आमची वैचारिक भूमिका वेगळी आहे. पण विचारधारेचा सन्मान केला पाहिजे. या प्रकारच्या टीका पक्षाच्या धोरणानुसार असू नयेत. पडळकर यांनी व्यक्तिगत टीका केली त्याची आम्ही दखल घेऊ. ही टीका आम्हाला मान्य नाही. पडळकर यांनी शरद पवार यांच्या बद्दल बोलणे हे योग्य नाही, असे देखील बावनुकळे म्हणाले.

# जितेंद्र आव्हाडांची न्यायालयात धाव

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

१९९१च्या प्रार्थनास्थळ कायद्याच्या समर्थनार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. प्रार्थनास्थळ कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिका यापूर्वी दाखल झाल्या आहेत. त्या याचिकांच्या सुनावणीत हस्तक्षेप करण्यास मुभा द्या, अशी विनंती आव्हाड यांनी हस्तक्षेप अर्जातून केली आहे. प्रार्थनास्थळ कायद्यानुसार, देशातील प्रार्थनास्थळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी ज्या स्थितीत होती, त्याच स्थितीत ठेवणे अनिवार्य आहे. धर्मनिरपेक्षता अबाधित ठेवण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मतेला धक्का देणारे हिंसाचार रोखण्यासाठी प्रार्थनास्थळ कायदा महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे, असा दावा आ. जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

# झाडे लावण्याचा मानस धूळखात




**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई-विरार शहर पालिकेने शहरात ५ जून रोजी शहराच्या रस्त्याच्या कडेला झाडे लावून जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा केला होता. यंदाच्या पावसाळ्यात महानगरपालिकेने शहरात १ लाख झाडांचे वृक्षारोपण करण्याचा मानस ठेवला होता. मात्र, पावसाळा संपून काही महिने लोटले तरीदेखील महानगरपालिकेने वृक्षारोपण करण्याच्या कामाला सुरुवात केली नसल्याचे दिसून आले आहे. यामुळे पालिकेने वृक्षारोपण करण्याच्या कामाचे दिलेले उद्दिष्टे कुठेतरी फोल ठरताना दिसत आहे.

वसई-विरार शहरात लागवड केल्या जाणाऱ्या झाडांमध्ये बांबू, आंबा, वड, पिंपळ, काजू, खैर, गुलमोहर, कडुलिंब, जांभूळ, बकुल , चिंच, आपटा, ऐन अशा विविध प्रकारच्या वृक्षाच्या प्रजातीचा समावेश असणार होता. शहरात कृत्रिम जंगल उभारण्याचा एक भाग म्हणून वृक्ष लागवडीचा प्रकल्प पालिका हाती घेणार होती. मात्र, पावसाळा संपून गेला तरी देखील पालिकेने झाडे लावण्याच्या मोहिमेला गती दिली नाही. तर, नियोजित केलेला मानस पालिकेच्या कागदावरच धुळखात पडला आहे.

# मुख्यमंत्री साहेब, असेच राज्य चालवणार का?

## राऊतांचा फडणविसांवर निशाणा



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बीडमधील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. तर, दुसरीकडे पुण्यातील आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतिश वाघ यांचीही हत्या करण्यात आल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर आता विरोधकही संतापले आहेत. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दोन्ही घटनांवरून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. देवेंद्र फडणवीसांना अशाच प्रकारे राज्य चालवायचे आहे का? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

खासदार संजय राऊत यांनी बुधवारी (दि.११)प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना राज्यातील मंत्रिमंडळ विस्ताराबाबत प्रश्न विचारण्यात आला. याबाबत ते म्हणाले की, निकाल लागून २० दिवस झाले, तरीही मंत्रिमंडळाची स्थापना होत नाहीय. गृहखातं कुणाला मिळणार, हेही ठरत नाहीय. यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. बीड जिल्ह्यातले मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या हत्या झाली. त्यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली.

त्यानंतर पुण्यातील मांजरीत आमदार योगेश टिळेकरांचे मामा सतीश वाघ सकाळी मॉर्निंग वॉकला गेले. तेव्हा त्यांचे अपहरण केले. त्यानंतर त्यांचा थेट मृतदेह सापडला. भाजपाचे अनेक आमदार आणि पडलेले आमदार ज्या पद्धतीने धमक्या देतात, ही भाषा गुंडाना सुद्धा शरमेनं मान खाली घालायला लावणारी आहे, असे म्हणत राऊतांनी संताप व्यक्त केला.

# ईव्हीएम प्रतिकृतींचे समुद्रात विसर्जन

## ठाकरे गटाचे ठिकठिकाणी आंदोलन



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमचा घोटाळा करून महायुती चोरीच्या मार्गाने सत्तेवर आली आहे. त्याच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून ईव्हीएमविरोधात ठिकठिकाणी आंदोलन केले जात आहे. मुंबईत शिवसैनिकांनी ईव्हीएमच्या प्रतिकृतीचे अरबी समुद्रात विसर्जन करून निषेध नोंदवला आहे.

ईव्हीएमच्या मुद्यावरून सत्ताधारी आणि विरोधक सध्या आमनेसामने आहेत. महाविकास आघाडीने ईव्हीएमविरुद्ध रान उठवले आहे. ठिकठिकाणी आंदोलने केली जात आहेत. मुंबईत शिवसेनेचे राज्य संघटक अखिल चित्रे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले गेले. ईव्हीएम विसर्जित केले नाही तर लोकशाही विसर्जित होईल, प्रगत देशांमध्ये निवडणुकीसाठी ईव्हीएमचा वापर केला जात नाही मग हिंदुस्थानात का, असा सवाल करत शिवसैनिकांनी यावेळी ईव्हीएम मशीनची प्रतिकृती अरबी समुद्रामध्ये विसर्जित केली आहे.

# थकबाकीदारांना महापालिकेचा दणका

## १ हजार ७८० नळजोडण्या खंडित




**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे महापालिकेची पाणी बिल थकबाकी वसुलीकरता पाणी पुरवठा विभागाने मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेत संपूर्ण महापालिका क्षेत्रात आतापर्यंत १ हजार ७८० नळ जोडण्या खंडित केल्या असून १५२ मोटर पंप जप्त केले आहेत. तसेच, एकूण ५० पंप रुम सील करण्यात आले असून थकबाकी वसुलीसाठी ३ हजार ३५४ थकबाकीदार ग्राहकांना नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. या पाणी बिल वसुली अभियानात आतापर्यंत सुमारे ५९.४३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

महापालिकेची पाणी बिल रक्कम सुमारे २२४ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची बिल रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी बिलाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी बिल वसुली अभियान सुरू करण्यास सांगितले आहे. त्यानुसार, पाणी बिलाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी बिलाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# कोल्हापूरकडे जाणारा राज्यमार्ग धोकादायक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर ते कोल्हापूर राज्यमार्गावरील करंबेळे मैल ते महाडिक थांबादरम्यानचा रस्ता कापण्यात आल्यामुळे राज्यमार्ग धोकादायक बनलेला आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून कोल्हापूरकडे जाणारा हा जवळचा मार्ग आहे. लांब पल्ल्याच्या गाड्या या मार्गावरून धावत असतात. तसेच, देवरूखकडे जाण्यासाठी या मार्गाचा वापर होत असतो. परंतु, या रस्त्याची चाळण झाली असून, रस्त्याच्या बाजूला हा मार्ग धोकादायक बनलेला आहे. घाटरस्त्यावर संरक्षक कठडे तुटल्यामुळे गाड्यांचे अपघातही होत आहेत. त्यामध्ये अनेकजणं जखमी होऊन काहींना मृत्यूलाही सामोरे जावे लागले. त्यामुळे या रस्त्याची त्वरित दुरुस्ती व्हावी, अशी मागणी होत आहे.



# करूळ घाट अद्यापही बंद

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

कोकण व पश्चिम महाराष्ट्र यांना जोडणारा सर्वात महत्त्वाचा असलेला करूळ घाट गेले ११ महिने नूतनीकरणाच्या नावाखाली बंद ठेवण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडून घाटातून वाहतूक सुरू करण्याच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. मात्र, वाहतूक सुरू करण्यास ते अपयशी ठरले आहेत. त्यांच्याकडून 'तारीख पे तारीख' देण्यात येत आहे. १५ डिसेंबरपर्यंत घाटातून एकेरी वाहतूक सुरू करण्यात येईल, तर जानेवारी २०२५ पासून घाटातून पूर्णपणे वाहतूक सुरू करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, घाटातील अपूर्ण काम पाहता दिलेली डेडलाईन तरी ते पाळणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, जुलैमध्ये झालेल्या पावसाने नवीन बांधलेल्या संरक्षक भिंतीसह रस्ताच वाहून गेल्यामुळे रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाचे पितळ उघडे पडले होते.

याबाबत सर्वच राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आवाज उठवला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून खराब झालेले काम परत संबंधित ठेकेदाराकडून करून घेण्याचे आश्वासन देण्यात आले. यादरम्यान पावसाचे चार महिने निघून गेले. तर, पावसाळा कमी होऊन आता दोन महिन्यापेक्षा जास्त काळ होऊन गेला आहे. मात्र घाटातील काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

## मलबार ग्लायडिंग फ्रॉग

# कुडाळ येथे दुर्मिळ बेडकाचे दर्शन

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

कुडाळ येथे 'मलबार ग्लायडिंग फ्रॉग' या दुर्मीळ बेडकाचे दर्शन झाले आहे. एसएसपीएम मेडिकल कॉलेज अँन्ड लाइफटाइम हॉस्पिटलमध्ये हा वन्यजीवप्रेमीला हा बेडूक आढळला आहे. सामान्यत: पावसाळी हंगामात आढळणारा हा बेडूक डिसेंबर महिन्यात दिसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

मलबार ग्लायडिंग फ्रॉग हा पश्चिम घाटात प्रदेशनिष्ठ असणारा बेडूक आहे. हवेत उडत जाणारा बेडूक म्हणून याची ओळख आहे. दक्षिण कोकणातील वेंगुर्ला, सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यामध्येच प्रामुख्याने याचा अधिवास आहे. कुडाळ तालुक्यातील धामापूर परिसरातही याची नोंद झाली आहे. मात्र, १ डिसेंबर रोजी मेडिकल कॉलेज अँन्ड लाइफटाइम हॉस्पिटलच्या आवारात मायक्रोबायोलॉजी लॅब टेक्निशियन पदावर काम करणाऱ्या जागृती सावंत यांना या मलबार ग्लायडिंग फ्रॉगचे दर्शन झाले होते. हा बेडूक वेगळा वाटल्याने त्यांनी त्याची छायाचित्रे आय-नॅचरलिस्ट यांच्या संकेतस्थळावर अपलोड केली होती. त्यानंतर त्याची ओळख पटली आहे.

मलबार ग्लायडिंग फ्रॉग हा वृक्षवासी असल्याने त्याची प्रजननाची क्रिया झाडावरच होते. समागमावेळी बेडकाची जोडी एखादे डबके किंवा वाहणाऱ्या ओढ्यावर असणाऱ्या झाडाच्या फांदीवर आसरा घेते. मादी फेसाळलेल्या घरट्यात साधारण ८९ ते २०६ संख्येने अंडी घालते. त्यानंतर नराने सोडलेल्या शुक्राणूमुळे अंडी फलित होण्यास सुरुवात होते. काही दिवसांनी या घरट्यामध्ये बेडूकमाशांची वाढ झालेली दिसते. त्यांना 'फ्रॉगलेट' म्हणतात.

पावसाळी हंगामात प्रामुख्याने दिसणारा हा बेडूक वर्षातील नऊ महिने शीतनिद्रेसाठी झाडांच्या उंच फांद्यांवर जातो. मात्र, त्याचे डिसेंबर महिन्यात झालेले दर्शन आश्चर्याचे होते. कुडाळ परिसरात तुरळक स्वरुपात पाऊस झाल्याने या बेडकाची शीतनिद्रा भंग पावल्याने त्याचे दर्शन झाल्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.



# जानकरांची खोत-पडळकरांवर टीका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस या गावात शरद पवार गेले होते. त्यानंतर महायुतीच्या भाजप जतचे आ. गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी शरद पवारांवर जोरदार टीका केली होती. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून माळशिरसचे आ. उत्तम जानकर खोत-पडळकरांवर टीका करत म्हणाले की, अशी बारीक उंदरे जाऊन तिथे पवारसाहेबांवर टीका करत असतात. बारक्या उंदरांच्या सुळसुळाटाने काय फरक पडत नाही. पवार साहेब पवार साहेब आहेत. त्यांनी भल्याभल्यांना लोळवले आहे. असे म्हणत पडळकर आणि खोत यांच्या टीकेला उत्तर दिले आहे.

निवडक

### विद्यार्थ्यांना विकास मार्गदर्शन

**खरोशी :** आमटेम येथे व्यक्तिमत्व विकास व संवाद कौशल्य या अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व ओवरहेड प्रोजेक्टर याचा वापर करून व प्रत्यक्ष मार्गदर्शन सामाजिक कार्यकर्ते विनिता तांडेल केले. यापुढेही अनेक उपक्रम राबवायचे असून त्यामध्ये खगोल शास्त्रीय ज्ञान, गणितीय ज्ञान आणि विशेष म्हणजे गरीब गरजू आणि होतकरू ज्यांच्यात शिकण्याची आवड आहे परंतु परिस्थिती आड येत अशा मुलांना मदतीची हात देऊन पुढे न्यावे असे उद्दिष्ट आहे.

### मच्छिमार सोसायटीचे उद्घाटन

**उरण :** पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांचे, व्यवसायिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडण्यासाठी व शासनाच्या विविध सेवा, सवलती, योजणांचा लाभ घेण्यासाठी मच्छिमारांच्या प्रश्नांना, समस्यांना न्याय देण्यासाठी त्यांचे अधिकार व हक्क त्यांना मिळवून देण्याच्या उद्देशाने उरण शहरातील कोळीवाडा येथे उरण कोळीवाडा पारंपारिक मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्था मर्यादित या मच्छिमार सोसायटीचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात करण्यात आले.

### दत्तजयंती निमित्त कार्यक्रम

**खांब :** रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे दत्त जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे. गुरूवर्य अलिबागकर, गोपाळ वाजे व धोंडू कोलाटकर यांच्या कृपाशीर्वादाने व गुरूवर्य नारायण दादा वाजे, गुरूवर्य पुरूषोत्तम महाराज पाटील व वै.गुरूवर्य भाऊ निकम यांच्या मार्गदर्शनाखाली दत्त जयंती सोहळा साजरा करण्यात येणार असून भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

**चिरनेर :** कातळपाडा चिरनेर गावातील श्रीदत्त जयंतीचा उत्सव संपूर्ण रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असून, गेल्या महिनाभरापासून संपूर्ण कातळपाडा ग्रामस्थांसह येथील काही कार्यकर्ते दत्त उत्सवाच्या तयारीत मग्न असून, या दत्त उत्सवाची संपूर्ण तयारी पूर्णत्वास आली आहे. शुक्रवारी ( दि.१३) ते रविवारी (दि.१५) या तीन दिवसांच्या कालावधी दरम्यान चालणाऱ्या या दत्तजयंती उत्सव सोहळ्यात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### गीता जयंती उत्साहात

**कर्जत :** कडाव येथील के.ई.एस इंग्लिश मीडियम स्कूल येथे श्रीमद्भगवद्गगीता जयंती साजरी करण्यात आली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन गाऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमासाठी शाळेचे संस्थेचे सदस्य सतिश पिंपरे हे उपस्थित होते. या दिवसाचे प्रास्ताविक योगिता तुपे यांनी केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका वृषाली वैद्य यांनी श्रीमद्भगवद्गीतेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी संभुस यांनी केले.

# रायगडचा पर्यटन विकास जलद करा

## खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या सूचना



**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम उत्तम दर्जाचे व जलदगतीने व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्राधिकरणाशी समन्वय राखून काम करावे. राज्य सरकारने मंजूर झालेला निधी १०० टक्के खर्च होईल यासाठी योग्य नियोजन करावे. अशा सूचना रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी केले.**

खासदार छत्रपती संभाजीराजे भोसलेयांच्या अध्यक्षतेखाली कोकण भवन येथील आयुक्त कार्यालयाच्या मुख्य दालनात सोमवारी (दि. ९) रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. रायगड किल्ला संवर्धन व किल्ल्याच्या आजूबाजूचा परिसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी राज्य सरकारकडून निधी मंजूर करण्यात आला आहे. या वेळी रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटनाची कामे उत्तम दर्जाची आणि जलदगतीने होण्यासाठी उपसमिती स्थापन करण्याच्या सूचना आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी संबंधितांना दिल्या. या बैठकीस कोकण विभागाचे महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, उपआयुक्त (नियोजन) प्रमोद केंबावी, रायगड उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, महाडचे उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बानापुरे, रायगड पाणी संवर्धन विभागाचे अधीक्षक अभियंता संजय शिंदे, रोहाचे सहाय्यक वनसंरक्षक रोहित चोबे, पेण-रायगड विद्यूत विभागाचे कार्यकारी अभियंता संजिवनी कट्टी, तसेच प्राधिकरणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**शिवसृष्टी उभारणार**

किल्ल्यांचा इतिहास जिवंत करून दाखविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून शिवसृष्टी निर्माण करण्यात येणार असल्याबाबतचे सादरीकरण बैठकीत करण्यात आले. यात रायगड किल्ल्यावर प्राचीन वस्तूंचे संवर्धन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यटकांना मनोरंजनासह गड-किल्ल्यांची माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. किल्ल्यावरील सर्व वस्तूंचे माहिती संग्रहण करण्यात येणार आहे.

**जिजामाता वाड्याचे संवर्धन करणार**

रायगड किल्ल्यावरील चित्त दरवाजा, नाना दरवाजा, खुबल्दा बुर्ज, महादरवाजा आदींचे संवर्धन व जीर्णोद्धार करणे, तसेच पर्यटक व शिवप्रेमींना रायगडावर पोहोचण्यासाठी मजबूत पायवाटा निर्माण करणे, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी महत्वाच्या सोयी उपलब्ध करून देणे, जलसंवर्धन करणे या बाबींचा समावेश आहे. याशिवाय पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी व जिजामाता वाडा यांच्या संवर्धन व जीर्णोद्धाराचे कार्य प्रस्तावित आहे.

**पाण्यासाठी ३० वर्षांचे नियोजन**

रायगड जलसंधारण विभागाद्वारे रायगड किल्ला, शिवसृष्टी आणि परिसरातील गावांसाठी भविष्यात ३० वर्षे पुरेल या दृष्टिकोनातून पाण्याचे नियोजन करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. त्या आराखड्याचे सादरीकरण यावेळी करण्यात आले.



# दिव्यांगांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा

## गटविकास अधिकारी संदीप कराड

**। रसायनी । वार्ताहर ।**

दिव्यांग यांच्यासाठी शासनाच्या अनेक योजना असून त्याचा लाभ घ्यावा, यासाठी संघटनांनी पुढाकार घ्यावा, त्याला लागणारी मदत खालापूर पंचायत समितीच्या वतीने देण्यात येईल, असे आश्वासन खालापूर गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी दिले. खालापूर पंचायत समितीच्या वतीने दिव्यांग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला,यावेळी खालापूर गटविकास अधिकारी संदिप कराड बोलत होते.

दिव्यांग दिन ३ डिसेंबर रोजी असतो, पण प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये हा दिवस साजरा होत असल्याने दिव्यांग संघटनांनी आजचा दिवस नक्की केल्याने पंचायत समितीच्या सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी खालापूर तालुक्यातील शंभरहून अधिक दिव्यांग महिला व बांधव उपस्थित होते.

खालापूर पंचायत समितीच्या वतीने सर्व दिव्यांग यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी दिव्यांग यांच्यासाठी शैक्षणिक, कृषी, आरोग्य, संजय गांधी निराधार योजना, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या वतीने, राज्य सरकार यांच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या योजना, दिव्यांगांना अर्धी घर पट्टी माफी, दिव्यांग दाखले याची परिपूर्ण माहिती देण्यात आली.तर दिव्यांग यांनी आपल्या शंका विचारून निरसन करून घेतले.

दिव्यांगासाठी असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती दिव्यांगांना देण्यासाठी प्रत्येक विभागात कार्यालय आणि तेथे एका कर्मचाऱ्याची नेमणूक केलेली असते. दिव्यांगांनी त्यांच्या शंका आणि समस्या त्या कर्मचाऱ्यांकडून सोडवून घ्याव्यात असे आवाहन त्यांनी केले.

विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांनी पंचायत समिती व जिल्हा परिषद, डॉ. शहा यांनी दिव्यांग दाखले, आरोग्य तपासणी, विस्तार अधिकारी खाडे यांनी कृषी, अनिल देशमुख यांनी शैक्षणिक, नायब तहसीलदार मिलिंद तिरहेकर यांनी संजय गांधी निराधार योजना, व तहसील कार्यालय यांच्या योजना, दिव्यांग विद्यार्थी यांच्या योजनांची माहिती नंदकुमार घरत, डॉ.पाठक यांनी पशु वैद्यकीय यांची माहिती दिली.

सर्व दिव्यांग यांचे स्वागत विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल यांनी केले. कस्तुरी विचारे यांनी कागदपत्रे उपलब्ध करून दिली. अपंग संघटनेचे अध्यक्ष दीपक पाटील, मंगेश पार्टे उपस्थित होते.



- पनवेल महापालिका आयुक्तांचा निर्णय
- २७ कोटींचा खर्च अपेक्षित

# कळंबोलीत साथरोग रुग्णालय

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ५ ई येथे सिडको मंडळाकडून समाज मंदिराच्या इमारतीमधील कोरोना साथरोग रुग्णालयाचे हस्तांतरण झाल्यावर पनवेल महापालिकेने ही इमारत पाडून पुन्हा नव्याने रुग्णालयासाठी इमारत बांधण्याचा निर्णय पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी घेतला. इमारत उभारणीसाठी सुमारे ७ ते ८ कोटी रुपयांचा खर्च आणि या रुग्णालयातील वैद्यकीय साहित्यासाठी सुमारे २० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. २७ कोटी रुपये खर्च करून कळंबोली येथे पहिले ५० खाटांचे साथरोग रुग्णालय येथे सुरू करणार आहे.

सेक्टर ५ ई मधील मुख्य चौकात १५ गुंठे क्षेत्रावर समाज मंदिराचे नियोजन सिडको मंडळाने केले होते. या तीन मजली इमारतीला बांधून ३० वर्षांहून अधिकचा काळ झाल्याने या इमारतीच्या छताचे प्लास्टर निखळू लागले होते. करोना साथरोग काळात सिडको मंडळाने याच समाज मंदिराच्या इमारतीची डागडुजी करून येथे ५८ खाटांचे करोना साथरोग रुग्णालय सुरू केले.करोना साथरोगानंतर या इमारतीचा वापर पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागाने करावा यासाठी समाजमंदिराची ही इमारत पालिकेकडे हस्तांतरण करण्यात आली. मागील दोन वर्षांपासून पालिका प्रशासकांचा काळ असल्याने या इमारतीमध्ये साथरोग रुग्णालय सुरू करण्याचे नियोजन केले जात आहे.

> **कळंबोली येथील सेक्टर ५ ई मधील तात्पुरते रुग्णालयाची इमारतीचे सर्वेक्षण केल्यानंतर मोठ्या प्रमाणात दुरुस्तीचे काम करण्याबाबत सुचविले होते. १९८४ साली ही इमारत बांधल्यामुळे जुन्या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात खर्च करण्याऐवजी या इमारतीचे पुनर्बांधकाम हाती घेतल्यास इमारत आणखी ३० वर्षे वापरात येऊ शकते अशी सूचना आयुक्तांकडून आल्यामुळे त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.**
> **– संजय कटेकर, शहर अभियंता, पनवेल महापालिका**

# आस्वाद पाटील यांचा राजीनामा

## निष्ठावंत कार्यकर्त्यांनी व्यक्त केली नाराजी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांनी त्यांच्या पदाचा आणि सदस्यपदाचा मंगळवारी (दि.१०) राजीनामा दिला. त्यांच्या या निर्णयामुळे शेकापच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांसह जनतेनेही नाराजी व्यक्त केली.

ॲड. आस्वाद पाटील हे शेकापच्या नेत्या, माजी राज्यमंत्री दिवंगत मीनाक्षी पाटील यांचे सुपूत्र आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकरी कामगार पक्षाने त्यांना विविध संधी उपलब्ध करुन दिल्या. लाल बावटा घेऊन त्यांनी पक्षाचे काम केले. पक्षाने त्यांच्यावर विश्वास ठेऊन जिल्हा चिटणीस पदापासून अनेक पदे त्यांच्याकडे सोपविली. रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, अर्थ व बांधकाम सभापती आदी पदे पक्षाने त्यांना दिली. मोठ्या विश्वासाने त्यांच्याकडे पक्षाची धुरा सोपविण्यात आली. परंतु त्यांनी वैयक्तिक कारणासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या सदस्यपदाचा राजीनामा दिला.

शेकापचा निष्ठावंत कार्यकर्ता कधीही आमिषाला बळी पडला नाही. हा इतिहास आहे. सत्ता नसतानाही पक्षाच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांनीही आपली तत्व, विचार सोडला नाही. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी पुरोगामी विचार घेऊन कायम लाल बावटा टिकविण्यासाठी संघर्ष केला.

त्यामुळे शेतकरी, अन्यासग्रस्त, कष्टकऱ्यांच्या हितासाठी लढणाऱ्या शेकापसोबत गद्दारी करणाऱ्यांना जनता माफ करणार नसल्याची प्रतिक्रिया अनेक कार्यकर्त्यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

# स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध

खोपोली : तीन वर्षांपासून अनेक नगरपालिका, महापालिका व जिल्हा परिषद निवडणुका या ना त्या कारणांनी प्रलंबित आहेत. रायगड जिल्ह्यातील सर्वच नगरपालिकेचा कारभार प्रशासक म्हणून मुख्याधिकाऱ्यांच्या हातात आहे, मात्र विधानसभा निवडणुकीत घवघवीत यशानंतर राज्यातील नवनिर्वाचित महायुती सरकारकडून लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्यासाठी हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

# समाजमाध्यमाद्वारे ४२ लाखांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

समाजमाध्यमाद्वारे पैसे कमवण्याचे आमिष दाखवून एका महिलेची सुमारे ४२ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली.

ऑनलाईन टास्क पूर्ण करा, भरपूर पैसे कमवा असे आमिष दाखवून एका महिलेची ४१ लाख ९२ हजार ५८२ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. फिर्यादी महिला वाशीत राहत असून रोखपाल म्हणून काम करतात. २ जूनला त्यांना रँक माय ॲप कंपनीकडून प्रतीक्षा नावाच्या महिलेचा फोन आला. त्यांनी टेलिग्राम या समाज माध्यमातील टास्क पूर्ण केल्यास एका फेरीसाठी ८०० ते १००० रुपये मिळतील असे आमिष दाखवले.

हेही वाचा फ्लेमिंगोंच्या अधिवासात रस्ता नको, राज्य सरकारच्या पाहणी पथकाच्या अहवालात खाडीकिनारचा रस्ता बंद करण्याची शिफारस

सहज बसल्या बसल्या हे काम होते. म्हणून फिर्यादी महिलेने काम करण्याची तयारी दाखवली. मात्र आगाऊ रक्कम, देयक देण्यापूर्वी विविध कर, हे काम करण्यासाठी नोंदणी शुल्क आदी कारणे पुढे करीत फिर्यादी यांच्याकडून २ जून ते ३ नोव्हेंबरदरम्यान ४२ लाख ८१ हजार ३४६ रुपये विविध खात्यांत मागवून घेतले.

अनेकदा मागणी केल्यावर त्यापैकी ८८ हजार ७६४ रुपये परत करण्यात आले. मात्र उर्वरित रक्कम देण्यास टाळाटाळ करीत राहिले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादी महिलेने या व्यवहारात त्यांच्याशी संपर्क साधणाऱ्या चार जणांच्या विरोधात वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# तटकरे महाविद्यालयात कौशल्य विकास प्रशिक्षण

**। तळा । वार्ताहर ।**

द.ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे मराठी विभागाअंतर्गत वक्तृत्व सूत्रसंचालन व कार्यक्रम नियोजन कौशल्य विकास प्रमाणपत्र कोर्स दिनांक १६ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०१४ या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे.

या कोर्समध्ये डॉ. अरुण शिंदे -प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख नाईट कॉलेज, कोल्हापूर, डॉ.भगवान लोखंडे- कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, डॉ. संगीता चित्रकोटी -प्राध्यापक व मराठी हिंदी विभाग प्रमुख- लक्ष्मी शालनी महिला महाविद्यालय पेजारी, डॉ. ओमकार पोटे -प्राचार्य पी.एन.पी महाविद्यालय, वेश्वी -अलिबाग, सुप्रसिद्ध कवी प्रा. शब्बीर हज्जू , कवी प्रा. प्रणय इंगळे, कवी हनुमंत येवले -राशिन- अहिल्यानगर इत्यादी तज्ञ मान्यवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.मराठी भाषा ही रोजगारभिमुख व्हावी. विद्यार्थ्यांना वकृत्व आणि सूत्रसंचालन व कार्यक्रम नियोजनाचे कौशल्य प्राप्त व्हावे यासाठी हा उपक्रम महाविद्यालयामध्ये राबवण्यात येणार आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी दिली. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून प्रा. विजय चव्हाण हे काम पाहणार आहेत. संस्थाचालक, प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे सहकार्य लाभणार असून या कार्यशाळेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाकडून करण्यात आले आहे.

# राडारोडा टाकणाऱ्या २० डंपरवर कारवाई

**पनवेल :** सिडकोच्या दक्षता विभागाच्या मार्गदर्शनाखाली मागील आठ दिवसांत वेगवेगळ्या पथकांनी २० डंपरचालकांना डंपर आणि राडारोड्यासह पकडले.मुंबईतून अटल सेतूमार्गे बेकायदा राडारोडा वाहतूक करून उलवे येथे टाकत असताना सिडकोच्या भरारी पथकाने ही कारवाई केली.सिडकोच्या मालकीच्या क्षेत्रात बेकायदा राडारोडा टाकणाऱ्यांना पकडण्यासाठी सिडको दक्षता विभागाचे प्रमुख सुरेश मेंगडे यांनी पोलीस व सिडकोचे अभियांत्रिकी आणि सुरक्षा विभागाचे संयुक्त पथक स्थापन केले.

३० नोव्हेंबरला सकाळी मानखुर्द येथील तीन डंपरमध्ये बेकायदा राडारोडा घेऊन अटल सेतूमार्गे गव्हाण गावाजवळ डंपर रिते करत असताना सिडकोच्या पथकाने पकडले. तसेच ८ डिसेंबर रोजी सायंकाळी उलवे येथे सिडकोच्या भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी मुंबईतून अटल सेतूमार्गे उलवे नोडमधील सेक्टर १२ येथे दाखल झालेल्या १४ वेगवेगळ्या संशयित डंपरवाल्यांची चौकशी केल्यावर या डंपरमधील राडारोडा उलवेत भरावासाठी आणल्याचे उघडकीस आले.

या प्रकरणी सिडको अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर न्हावाशेवा पोलीस ठाण्यात १४ डंपरचालकांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच ९ डिसेंबरला सायंकाळी उलवे येथील सेक्टर १८ मधील भूखंड क्रमांक ४९ येथे चालकाला मुंबईतून राडारोड्याने भरलेल्या डंपरसह पकडले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नोकरी! नोकरी !! नोकरी!!! ✻ नवोदित पाहिजेत..✻ केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण -१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर . पगार - ₹१०,०००/- ते १२०००/- पर्यंत. (योग्यतेनुसार) कामकाज कालावधी - दिवस पाळी ८ तास. ठिकाण - अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.
- अलिबाग एस्टीस्टँन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी कॉम्प्युटर नॉलेज असलेली मुलगी पाहिजे. संपर्क :- ९२६०१०१४४७
- रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं हव आहे !! संपर्क : ९६०७१०२३५७ ठिकाण - सासवणे
- तत्काळ पाहिजे : अलिबाग येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी असिस्टंट कुक आणि वेटरची आवश्यकता आहे. संपर्क : ०८४८३९७३१०३
- अलिबागपासून एक किलोमीटर अंतरावर एक एकर रहिवासी (R zone) जमीन रिसॉर्ट साठी लीजवर देणे आहे. संपर्क : ९९६०२६४६६०/९४२२४९४६०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## हिरव्यागार दुभाजकांमुळे वातावरण आल्हाददायक

# विदेशी फुलझाडांमुळे खुलले खारघरचे सौंदर्य

**। पनवेल । वार्ताहर ।**

**निसर्गरम्य शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खारघर वसाहतीमधील रस्ते दुभाजकांच्या सुशोभीकरणाचे काम पालिकेकडून हाती घेण्यात आले आहे. दुभाजकांत रंगीबेरंगी विदेशी फुलांच्या झाडांची लागवड केल्यामुळे पर्यावरण, तसेच शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. हिरव्यागार दुभाजकांमुळे वाहनचालकांनासुद्धा आल्हाददायक वाटत आहे.**

सिडकोने खारघर शहर विकसित करताना रस्त्याच्या दुभाजकात पाम झाडांची लागवड करून रस्ते सुशोभित केले होते; मात्र पनवेल महापालिका अस्तित्वात आल्यानंतर खारघर वसाहत पनवेल पालिकेकडे हस्तांतरित झाली. दरम्यान, पालिकेकडे खारघर वसाहत हस्तांतरित झाल्यावर दुभाजकात, तसेच उत्सव चौक परिसरातील हिरवळकडे दुर्लक्ष झाल्यामुळे उन्हामुळे झाडे सुकून गेली होती. हिरानंदानी पुलाकडून बँक ऑफ इंडिया सर्कल आणि स्टेट बँक ऑफ इंडिया कॉलनीकडून भारती विद्यापीठमार्गे उत्सव चौक, सेंट्रल पार्ककडून तळोजा शीघ्र कृती दल दरम्यानच्या मुख्य रस्ते, तसेच बँक ऑफ इंडियाकडून घरकुल, वास्तुविहार आणि सेक्टर १८कडून उत्सव चौकमार्गे सेक्टर सहा आणि डेली बाजारकडून चेरोबा मंदिर; तर शहीद योगेश पाटील पेट्रोलपंपाकडून रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलकडे जाणारा रस्ता, ग्रामविकासकडून मुर्बी गाव आणि स्पॅगेटीकडून पेठगाव आणि तळोजा गावकडे जाणारा याशिवाय जलवायूकडून ओवेगाव अशा मुख्य रस्त्यांवरील १४ किलोमीटर दुभाजकांचे पालिकेकडून सुशोभीकरण करण्यात येणार आहे.



ही विदेशी फुलझाडे लावणार आलमंदा, पेंडूनुस स्टुबेरी, हमेलिया, तगर मिनी, इक्सोरा सिंगापोरेन्सिस, वाडेलिया, ग्राबा पल्पल सिंगल फ्लॉवर, लार्ज फ्लॉवरिंग ट्री, दुरांता गोल्डन, थेवेटिया, पफ प्लांट आदी विदेशी फुलझाडे दुभाजकांमध्ये लावण्यात येत आहेत.

देखभाल दुरुस्तीसाठी एक कोटीपालिकेने दुभाजक सुशोभीकरणासाठी एका एजन्सीची तीन वर्षांसाठी नेमणूक केली आहे. दुभाजकात विविध फुलांची झाडे लावून देखभाल दुरुस्तीचे काम देण्यात आले आहे. या कामासाठी पालिका एक कोटी रुपये खर्च करणार असल्याचे समजते.

सुशोभीकरणासाठी तीन कोटीपनवेल महापालिकेने खारघर, कामोठे, कळंबोली आणि पनवेल वसाहतीमधील विविध रस्ते दुभाजक सुशोभीकरणाचे काम एका एजन्सीला दिले आहे. या कामासाठी पालिकेकडून तीन कोटी ८५ लाख ६१ हजार रुपये खर्च केला जाणार आहे.

> **खारघर वसाहतीमधील जवळपास १४ किलोमीटर रस्त्यांवरील दुभाजकाचे पालिकेकडून सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले. दुभाजकांत विविध फुलांची झाडे लावली जाणार आहेत. रस्ते दुभाजकांमुळे शहराच्या सौंदर्यात, तसेच पर्यावरणात भर पडणार आहे.**
> **– वैभव विधाते, उपायुक्त, पनवेल महापालिका.**

# एसटीच्या अनियमिततेमुळे प्रवासी हैराण

## तळा बसस्थानकात वारंवार एसटी रद्द होत असल्याने नाराजी




**। तळा । वार्ताहर ।**

तळा बसस्थानकातील एसटीच्या अनियमिततेमुळे प्रवासी हैराण झाले असून, वारंवार रद्द होणाऱ्या एसटी बसमुळे प्रवासीवर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे.

तळा बसस्थानकातून दिवसाला ६० ते ६५ एसटीच्या फेऱ्या होतात. यामुळे तळा बसस्थानकात नागरिकांची नेहमीच वर्दळ पहायला मिळते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून बसस्थानकातून एसटीची वाहतूक सुरळीत होत नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. काही दिवसांपूर्वी सुरू करण्यात आलेली मुरुड-तळामार्गे पुणे बस अवघ्या काही दिवसांतच बंद करण्यात आली. यांसह ग्रामीण भागासाठी असलेल्या बसदेखील डेपोतून गाडीच येत नसल्याने रद्द होतात.

तर काही वेळा बस ब्रेकडाऊन झाली, टायर पंक्चर झाले, अशा अनेक कारणांमुळे रद्द करण्यात येत आहेत. यांसह नियमित चालणाऱ्या शटल सेवाही वारंवार बंद केल्या जात आहेत.

यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, एसटीअभावी जास्तीचे पैसे खर्च करून आपल्या इच्छितस्थळी पोहोचण्यासाठी खासगी वाहनाने प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. प्रवाशांचा प्रतिसाद मिळत नसल्याचे कारण सांगून अनेक बस रद्द करणाऱ्या एसटी महामंडळ प्रशासनाकडून नफ्यात चालणाऱ्या बसदेखील बऱ्याचदा आगारातून सोडल्या जात नाहीत. त्यामुळे कमी उत्पन्न दाखवून बहुतांश बस बंद करण्याचा घाट तर एसटी प्रशासनाकडून घातला जात नाही ना, असा प्रश्न आता सर्वसामान्य प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल चेतन रमेश शर्मा व हेमलता चेतन शर्मा यांनी मौजे तिवरे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील सुयोग कृषी फलोद्यान विकास सहकारी संस्था मर्यादित (नोंदणी क्रमांक आरजीडी/केजेडी/अेजीआर/एम्/६०१/ सन ९५-९६ दिनांक २५/०९/१९९५) सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर १७/७,२८/३,२८/४ शेती प्लॉट नंबर १ चा शेअर सर्टिफिकेट नंबर ३ (शेअर्स नंबर ११ ते १५) या प्लॉट मिळकतीचे मालक यांचे ताबा कब्जाचे एकुण प्लॉट क्षेत्र ०-५९-८० हे आर पॉ या प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार सौ रुचिरा चंद्रशेखर धामणस्कर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

या प्लॉट मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १२/१२/२०२४

खरेदीरातर्फे वकील
**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे फणसापूर तर्फे उमटे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक मे.समर्थ ऑप्टो इलेक्टो पॉलीमार प्रा. लि. तर्फे संचालक सरीता पासपोला हे असून यांचेकडून विकत घेणे संदर्भात बोलणी चालु असुन सदर मिळकतींचा व्यवहार करण्याचा ठरलेले आहे. सदर त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र(आर.चौ.मी.) | आकार(रू.पैसे) |
|---|---|---|---|
| फणसापूर तर्फ उमटे ता.अलिबाग, जि.रायगड | ३६/१/ब | ३०-००-०० | ३००.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैंकी अकृषिक आर.चौ.मी. क्षेत्र ८-४८-००, आकार ८४.३०.८४८ चौ.मी. व त्यावरील बांधकाम क्षेत्र २२८६ चौ. फुट एवढे क्षेत्र आणि ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी असेंसमेंट सदरी नोंद असलेली मिळकत नं. ६५० फणसापूर मालकांचे नाव मे. समर्थ ऑप्टो इलेक्टो पॉलीमार प्रा. लि., घराची लांबी X रुंदी ५४ X ४२, एकूण क्षेत्रफळ चौ.स्केअर फुट २२६८ एवढे क्षेत्र विकत घेत आहे. सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : १२/१२/२०२४

**ॲड. पुनित रविंद्र पाटील**
मु.पो.हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८१४९५१६०३५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, आमचे आशिलांनी गाव मौजे निगडोली, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली मिळकत त्याचे समोर नमुद मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे निगडोली, ता.खालापूर, जि.रायगड येथील अधिकार अभिलेखात खालीलप्रमाणे नमूद असणारी शेती मिळकत**

| भोगवटादार | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| अनंत सिताराम पाटील | ५ | १२ | ०-१७-०० पैकी काळुबाई धोंडू बांदल यांचा रस्ता वहिवाटीचा हक्क २७.५१ चौ.मी. वगळून | ०.१२ |
| | ६ | ३ | ०-२९-० पैकी काळुबाई धोंडू बांदल यांचा रस्ता वहिवाटीचा हक्क ११.१० चौ.मी. वगळून | ०.२८ |
| | ७ | ० | ०-६६-० पैकी विक्री केलेले क्षेत्र ०-३५-० | ०.५० |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, बक्षिस, साठेकरार, फरोक्त कुळ, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, अतिक्रमण वगैरे प्रकारचा हक्क हितसंबंध अगर बोजा असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदारांचे वकील यांच्याकडे आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत. असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून उपस्थित होणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कळावे.
ठिकाण : कर्जत
दिनांक : १२/१२/२०२४

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
पत्ता कोर्ट व्हिव बिल्डींग, सदनिका क्र.१०१
कर्जत दिवाणी न्यायालयासमोर कर्जत रायगड
मो.नं. ९६०४५४५७७७

**ॲड. एस.व्ही.होनराव**
रा. ५५ क, दुर्गा पेठ, सातारा.
मो. नं. ९८८१२३८०२६

### जाहीर समन्स
### सातारा येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो यांचे कोर्टात

**२ रे. दि. अपील नं. २६९/२०१२**
**नि. १२७**

**१) गुलमहमंद शेख** ) अपेलंट
विरुद्ध
**श्रीमती द्रौपदाबाई संभाजी किर्दत वगैरे** ) रिस्पॉडंट

ज्याअर्थी अपेलंट प्रस्तुतचे अपील रिस्पॉउंट यांचेविरुध्द मुळ दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन मागणेकरीता Specific Performance चा स्पे. दि. मु. नं. १८९/२००२ याचा निकाल दि. ९/७/२०१० रोजी झालेल्या निकालावर नाराज होवून सर्व अपेलंट मुळ वादी यांनी प्रतिवादीविरुध्द दाखल केलेला असून यातील रिस्पॉउंडंट नं. 1(C) (iv) सौ. देवता सुदाम निकम रा. खारघर, सेक्टर नं. १२ नवी मुंबई जि. रायगड यांना नमुद पत्यावर रजिस्टर ए.डी.ने समन्स पाठविले असता पत्ता अपुरा असा रिमार्क मारुन परत आलेले आहे.

त्याअर्थी या जाहीर समन्स रिस्पॉडंट नं. 1(C) (iv) सौ. देवता सुदाम निकम रा. खारघर, सेक्टर नं. १२ नवी मुंबई जि. रायगड यांना या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, मे. मुख्य जिल्हा न्यायाधीश सो सातारा (श्री. व्ही.आर. जोशी सो) यांचे कोर्टामध्ये नेमली पुढील ता. ०३/०१/२०२५ रोजी असून त्या दिवशी मे. कोर्टात सकाळी ठिक ११ वाजता स्वतः अगर आपले वकील, मुखत्यार मार्फत हजर राहून आपली बाजु मांडावी. सदर दिवशी आपण गैरहजर राहील्यास आपले काही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत अपिलाचे काम चालविण्यात येईल. याची नोंद घेणेसाठी ही जाहीर समन्स दिली असे.

**सातारा**
**दि. १०/१२/२०२४**

शिक्का

**सी. एस. कांबिरे**
**अधिक्षक**
**मे. जिल्हा न्यायाधीश सो सातारा**

**ॲड. एस.व्ही.होनराव**
रा. ५५ क, दुर्गा पेठ, सातारा.
मो. नं. ९८८१२३८०२६

### जाहीर समन्स
### सातारा येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो यांचे कोर्टात

**३ रे. दि. अपील नं.४६९/२०१२**
**नि. ११७**

**१) सातारा सिरॅमिक इंडस्ट्रीज** ) अपेलंट
विरुद्ध
**श्रीमती द्रौपदाबाई संभाजी किर्दत वगैरे** ) रिस्पॉडंट

ज्याअर्थी अपेलंट प्रस्तुतचे अपील रिस्पॉडंट यांचेविरुध्द मुळ दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन मागणेकरीता Specific performance चा स्पे. दि. मु. नं. १८९/२००२ याचा निकाल दि. ९/७/२०१० रोजी झालेल्या निकालावर नाराज होवून सर्व अपेलंट मुळ वादी यांनी प्रतिवादीविरुध्द दाखल केलेला असून यातील रिस्पॉउंट नं. 1 (C) (iv) सौ. देवता सुदाम निकम रा. खारघर, सेक्टर नं. १२ नवी मुंबई जि. रायगड यांना नमुद पत्यावर रजिस्टर ए.डी.ने समन्स पाठविले असता पत्ता अपुरा असा रिमार्क मारुन परत आलेले आहे.

त्याअर्थी या जाहीर समन्स रिस्पॉउंट नं. 1 (C) (iv) सौ. देवता सुदाम निकम रा. खारघर, सेक्टर नं. १२ नवी मुंबई जि. रायगड यांना या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, मे. मुख्य जिल्हा न्यायाधीश सो सातारा (श्री. व्ही. आर. जोशी सो) यांचे कोर्टामध्ये नेमली पुढील ता. ०३ /०१/२०२५ रोजी असून त्या दिवशी मे. कोर्टात सकाळी ठिक ११ वाजता स्वतः अगर आपले वकील, मुखत्यार मार्फत हजर राहून आपली बाजु मांडावी. सदर दिवशी आपण गैरहजर राहील्यास आपले काही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत अपिलाचे काम चालविण्यात येईल. याची नोंद घेणेसाठी ही जाहीर समन्स दिली असे.

**सातारा**
**दि. १०/१२/२०२४**

शिक्का

**सी. एस. कांबिरे**
**अधिक्षक**
**मे. जिल्हा न्यायाधीश सो सातारा**

**ॲड. एस.व्ही.होनराव**
रा. ५५ क, दुर्गा पेठ, सातारा.
मो. नं. ९८८१२३८०२६

### जाहीर समन्स
### सातारा येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो यांचे कोर्टात

**१ रे. दि. अपील नं.२६८/२०१२**
**नि. १२१**

**१) मेसर्स अभिजात इक्वीपमेंटस्** ) अपेलंट
विरुद्ध
**श्रीमती द्रौपदाबाई संभाजी किर्दत वगैरे** ) रिस्पॉडंट

ज्याअर्थी अपेलंट प्रस्तुतचे अपील रिस्पॉडंट यांचेविरुध्द मुळ दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन मागणेकरीता Specific performance चा स्पे. दि. मु. नं. १८९/२००२ याचा निकाल दि. ९/७/२०१० रोजी झालेल्या निकालावर नाराज होवून सर्व अपेलंट मुळ वादी यांनी प्रतिवादीविरुध्द दाखल केलेला असून यातील रिस्पॉउंट नं. 1 (C) (iv) सौ. देवता सुदाम निकम रा. खारघर, सेक्टर नं. १२ नवी मुंबई जि. रायगड यांना नमुद पत्यावर रजिस्टर ए.डी.ने समन्स पाठविले असता पत्ता अपुरा असा रिमार्क मारुन परत आलेले आहे.

त्याअर्थी या जाहीर समन्स रिस्पॉउंट नं. 1 (C) (iv) सौ. देवता सुदाम निकम रा. खारघर, सेक्टर नं. १२ नवी मुंबई जि. रायगड यांना या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, मे. मुख्य जिल्हा न्यायाधीश सो सातारा (श्री. व्ही. आर. जोशी सो) यांचे कोर्टामध्ये नेमली पुढील ता. ०३ /०१/२०२५ रोजी असून त्या दिवशी मे. कोर्टात सकाळी ठिक ११ वाजता स्वतः अगर आपले वकील, मुखत्यार मार्फत हजर राहून आपली बाजु मांडावी. सदर दिवशी आपण गैरहजर राहील्यास आपले काही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत अपिलाचे काम चालविण्यात येईल. याची नोंद घेणेसाठी ही जाहीर समन्स दिली असे.

**सातारा**
**दि. १०/१२/२०२४**

शिक्का

**सी. एस. कांबिरे**
**अधिक्षक**
**मे. जिल्हा न्यायाधीश सो सातारा**

### VACANCY AVILABLE
### ST.MARY'S CONVENT HIGHER SCONDARY SCHOOL CHENDHARE-ALIBAG

The following vacancy is available :-
NIGHT WATHCMEN
PEONS

सेंट मेरीज कॉन्व्हेंट हायर सेकंडरी स्कूल मध्ये पहारेकरी (सुरक्षा रक्षक) व शिपाई या पद भरणे आहे. शैक्षणिक पात्रता-कमीत कमी १० वी पास असावा. इच्छुक उमेदवार यांनी कार्यालयीन वेळेत दिनांक २५ डिसेंबर पर्यंत लेखी अर्ज व कागदपत्रांसह भेटावे. कार्यालयीन वेळ सकाळी ९.३० ते दुपारी १.३०

### WALK IN INTERVIEW
### पाहिजेत

महाराष्ट्र शासन पत्र क्र.MEI-2018 CR-118DESK-5/ दि. ३०.०५.२०२८ नुसार अल्पसंख्याक दर्जा प्राप्त मुस्लीम एज्युकेशन ॲण्ड वेलफर सोसायटी तळा संचलीत हाजी ताहीर जाळगांवकर उर्दु हायस्कुल तळा. ता.तळा. जि.रायगड या माध्यमिक (उर्दु माध्यम) करीता खालील पात्रतेच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची शिक्षण सेवक कालावधीसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून गरज आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने आपल्या मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी दि. १६/१२/२०२४ रोजी वार सोमवार सकाळी ११.३० वा. माध्यमिक शाळेच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

| अ.क्र | पद | माध्यम | शैक्षणिक पात्रता | संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | क.लिपीक | उर्दु | एस.एस.सी,एच.एस.सी,बी.कॉम, सी.सी.सी किंवा एम.एस.सी.आय.टी.संगणक कोर्स, मराठी व इंग्रजी टंकलेखन आवश्यक | ०१ |

सही /-
**मुख्याध्यापक एच. टी. जे. उर्दु हायस्कुल**
**तळा. ता. तळा. जि. रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे देवनगरी पेण, ता.पेण जि.रायगड येथील खालील वर्णनाची सदनिका मिळकत विद्यमान मालक समृद्धी संतोष माळी यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे देवनगरी पेण, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकतः-**

| सोसायटीचे नाव | क्षेत्र (चौ.फुट /चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| जगदंबा हिल्स व्ह्यु सोसायटी पहिला मजला, फ्लॅट नं.१०४, नगरपरिषद मालमत्ता क्र. PENN00017345 | (१९.३८ चौ.मी) २७६ चौ.फुट कारपेट | ३६५४ |

तरी वर नमुद सदनिका मिळकतीवर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाही इसमांचा संस्थांचा साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, वारसाहक्क, पोटगी, गहाण, तारण, बोजा, भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग, इजमेंट हक्क वगैरे अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत अशाप्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असून सदनिकेचे टायटल मार्केटेबल क्लिअर आहे असे समजुन आमचे अशिल मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीच्या खरेदीविक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच अशा प्रकारचा कोणताही हक्क असल्यास तर तो जाणीवपुर्वक आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १०/१२/२०२४

सही/-
**ॲड.परेश अ.देशमुख**
**जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड**

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.१६७/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो, माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. विठाबाई तुकाराम मोरे
वय : ६९ वर्षे, धंदा : गृहिणी, अर्जदार
रा. मु. पो. चाच,
ता. माणगांव, जि.रायगड.

**विरूद्ध**

५. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत शिरसाड,
ता.माणगांव, जि.रायगड. सामनेवाला
६. गटविकास अधिकारी सो..
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्रीम. विठाबाई तुकाराम मोरे यांची आई कै. बेंडीबाई त्रिंबक ठुले ही दि.०४/११/१९९९ रोजी मौजे चाच, ता.माणगांव, जि.रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. ०७/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै.बेंडीबाई त्रिंबक ठुले ही दि. ०४/११/१९९९ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. विठाबाई तुकाराम मोरे यांची आई कै.बेंडीबाई त्रिंबक ठुले ही दि.०४/११/१९९९ रोजी मौजे चाच, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता.: २४/१०/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-०३२**

क्र.अपील/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/२४०/२०२४ दिनांक ०९-१२-२०२४

**जाहीर सूचना**

प्रति,
श्री. जेरेल्ड मायकल मिस्किटा,
रा. ७२,ए.ए.मिस्किटा हाऊ, जुने पोलीस स्टेशन रोड,
विलेपार्ले, (प.) मुंबई ४०० ०५६ ... अर्जदार

**विरुद्ध**

१. श्री. संतोष साहेबराव कोलते
२. श्री. वसंत चेन्नप्पा सॅलियन,
दोघे रा. ५०५, एन.एम.एस. टायटॅनिअम,प्लॉट नं. ७४, सेक्टर नं. १५, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
३. श्रीम. सविता देवराम मोरे
४. रविंद्र देवराम मोरे मयत तर्फे वारस
४.१ श्रीम. अरुणा रविंद्र मोरे
४.२ श्रीम. जागृती रविंद्र मोरे
४.३ श्रीम. मयुर रविंद्र मोरे
५. श्री. हरिश्चंद्र बळीराम मोरे
६. श्रीम. शकुंतला रामू वाघमारे
७. श्री. गजानन महादू पांगारे
८. श्री. ज्ञानेश्वर महादू पांगारे
९. श्रीम. गीता महादू पांगारे
१०. श्रीम. कविता महादू पांगारे
अ.क्र. ३ ते १० रा. दूरशेत, ता. खालापूर, जि. रायगड
११. श्रीम. वैशाली महादेव भोईर
१२. श्री. भूषण महादेव भोईर
१३. श्री. विनीत महादेव भोईर
अ.क्र. ११ ते १३ रा. करावे, नवी मुंबई, जि. ठाणे
१४. श्री. संदीप दत्तात्रय जाधव
१५. श्रीम. मंजुश्री संदीप जाधव
१६. श्री. अद्वैत संदीप जाधव,
अ.क्र. १४ ते १६ रा. आर.एच.७/८, संघेश्वर दर्शन,
मखवारा चौक, काळा तलाव, कल्याण, जि. ठाणे. ..सामनेवाले

**विषय :- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद अपील क्र. ५९/२०२३, दि. २०-०२-२०२४ चे विरूद्ध फेरतपासणी अर्ज**

सामनेवाले यांना कळविण्यात येते की, वरील अपील/फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट मुंबई-३२ येथील कार्यालयात दि. १३-०१-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वत: अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास अपिल फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसीलदार (अपिले)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभागकरीता**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक प्रियंका उदय त्रिंबककर यांच्याकडुन खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग | ५९० | ०.०८.०० | ०.५० |

ही मिळकत या नोटीसचा विषय आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांना कळावे,

अलिबाग
दिनांक : ११/१२/२०२४

सही /-
**ॲड. पराग मधुकर गुरव**
रा. मधुमालती निवास, रामनाथ रोड
ता. अलिबाग जि. रायगड
मोबा. ९३२६१३१४८०/८४४६८८०००९

### पाहिजेत

महाराष्ट्र शासन आदेश क्र. जा.क्र.राजिप/शिक्षण/माध्य/टी.एन.टी.-२/ २०२४/३७७१ दिनांक : ०९/१२/२०२४ नुसार खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळ खरवली संस्थेच्या **नूतन माध्यमिक विद्यालय खरवली, ता.माणगांव, जि. रायगड** या माध्यमिक शाळेकरीता खालील पात्रतेच्या शिक्षकेतर कर्मचारी '**कनिष्ठ लिपीक**' या पदासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून गरज आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी स्वखर्चाने आपल्या मुळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी मंगळवार दि १७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा माध्यमिक शाळा नुतन माध्यमिक विद्यालय खरवली ता.माणगांव जि.रायगड या शाळेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | माध्यम | शैक्षणिक पात्रता | संवर्ग | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | क.लिपीक | मराठी | एच.एस.सी.,बी कॉम (प्राधान्य) संगणक कोर्स सी.सी.सी. किंवा एम.एस.सी.आय.टी.मराठी व इंग्रजी टायपिंग आवश्यक | खुला | १ |

**मुख्याध्यापक**
**नूतन माध्यमिक विद्यालय खरवली, ता.माणगांव, जि.रायगड**

**अध्यक्ष**
**खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळ खरवली, ता.माणगांव, जि. रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत त्याचे मालक १.लीलाबाई लक्ष्मण फाळे, २. सुनील लक्ष्मण फाळे, ३. सुरेखा लक्ष्मण फाळे, ४. सविता लक्ष्मण फाळे ५. रेखा लक्ष्मण फाळे ६. अविनाश लक्ष्मण फाळे ७. राज लक्ष्मण फाळे
१ निरंजन मोहनलाल ओसवाल २. सिमा निरंजन ओसवाल यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. शिंगढोळ, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| अनु. क्रं. | मालकाचे नाव | सर्वे नंबर/गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १. लीलाबाई लक्ष्मण फाळे<br>२. सुनील लक्ष्मण फाळे<br>३. सुरेखा लक्ष्मण फाळे<br>४. सविता लक्ष्मण फाळे<br>५. रेखा लक्ष्मण फाळे<br>६. अविनाश लक्ष्मण फाळे<br>७. राज लक्ष्मण फाळे | १/१ | जिरायत ०.३१.००<br>पोटखराबा ०.०७.००<br>एकूण ०.३८.०० | ०.२८ |
| २ | निरंजन मोहनलाल ओसवाल<br>सिमा निरंजन ओसवाल | १/३ | जिरायत ०.०९.००<br>पोटखराबा ०.०१.००<br>एकूण ०.१०.०० | ०.०८ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक. ११ डिसेंबर २०२४

**(सुमित साहेबराव साबळे)**
ॲडव्होकेट
कार्यालय शॉप ३, तळ मजला, साई विला अपार्टमेंट
महिला मंडळ बाजूला, सम्राट नगर मु. पो. नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड. मोबाईल क्र. ८१४९२३६७६५/७७१९९४४५५८

निवडक

## धिल्लॉनवर फिक्सींगचा आरोप

**नवी दिल्ली :** अबुधाबी टी-२० क्रिकेट लीगमधील पुणे डेव्हिल्स संघाचा माजी प्रशिक्षक सनी धिल्लॉन याच्यावर फिक्सिंगच्या आरोपावरून आयसीसीने सहा वर्षांची बंदी घातली आहे. अमिराती क्रिकेट मंडळाच्या लाचलुचपत प्रतिबंधक कोडनुसार ही कारवाई करण्यात आली. २०२१ मधील अबुधाबी टी-२० लीगमधील हा प्रकार आहे. धिल्लॉनसह आठ जणांवर मॅच फिक्सिंगसाठी प्रयत्न केल्याचे आरोप ठेवण्यात आले होते. यात बांगलादेशचा अष्टपैलू नासिर हुसैन याचाही समावेश आहे.

## आफ्रिकेची पाकवर आघाडी

**केप टाऊन :** दक्षिण आफ्रिकेने पहिल्या टी-२० सामन्यांत पाकिस्तानवर ११ धावांनी विजय मिळवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात माजी कर्णधार बाबर आझम याचे अपयश पुन्हा एकदा चर्चेचा मुद्दा ठरला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या १८४ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानला ८ बाद १७२ धावा करता आल्या. डेव्हिड मिलरच्या ४० चेंडूंत कुटलेल्या ८२ धावा आणि जॉर्ज लिंडेच्या ४८ धावांच्या योगदानाच्या जोरावर आफ्रिकेने ९ बाद १८३ धावा उभ्या केल्या.

## निलम भारद्वाजचे द्विशतक

**अहमदाबाद :** एकदिवसीय क्रिकेटमध्ये अनेकांनी शतके ठोकली आहेत. परंतु, द्विशतके फार कमी लोकांना साकारता आली आहेत. आता ५० षटकांच्या क्रिकेटमध्ये द्विशतक करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत उत्तराखंडची महिला क्रिकेटपटू निलम भारद्वाज हिचाही समावेश झाला आहे. सध्या भारतात वरिष्ठ महिला क्रिकेट चषक स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत १८ वर्षीय निलम उत्तराखंडकडून खेळत आहे. तिने नागालँडविरुद्ध अहमदाबाद येथे मंगळवारी (दि.१०) शानदार द्विशतक झळकावत विक्रमी कामगिरी केली.

## धोनी नंबर वनचा सेलिब्रिटी

**नवी दिल्ली :** भारतीय माजी क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी चेन्नई सुपर किंग्ज संघामधून क्रिकेट खेळत असून निवृत्ती नंतरही तो क्रिकेटमध्ये सक्रिय आहे. धोनी नेहमीच सोशल मीडियावर चर्चेत असतो. क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर धोनी आपलल्या अनेक टीव्ही जाहीरातींमध्ये पाहायला मिळतो. तो देशातील एक प्रमुख सेलिब्रिटी आहे. तो अनेक ब्रँड्सच्या जाहीराती करतो व ब्रँड ॲम्बेसिडर देखील आहे. धोनीकडे एकूण ४२ ब्रँड एनडॉर्समेंट असून तो भारतातला सर्वाधिक ब्रँड एनडॉर्समेंट्स असणारा सेलिब्रिटी बनला आहे.

## मुंबईसमोर विदर्भचे आव्हान

**जयपूर :** जयपूर पिंक पँथर्स संघाने प्रो कबड्डी स्पर्धेतील मंगळवारी झालेल्या लढतीत गुजरात जायंट्स संघावर ४२-२९ असा विजय मिळवला आणि या प्रतिष्ठेच्या स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखले आहे. मध्यंतराला जयपूर संघाने २७-१६ अशी आघाडी मिळविली होती. जयपूर संघाने नवव्या विजयासह ५४ गुणांची कमाई केली आहे. त्यांचा संघ सहाव्या स्थानावर आहे. गुजरातचा संघ ११व्या पराभवासह ११व्या स्थानावर आहे.

# भारतीय महिलांचा ऑस्ट्रोलियाकडून पराभव

■ मालिका ३-० ने गमावली

■ स्मृती माधनाची शतकी खेळी व्यर्थ



**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेलेल्या भारतीय महिला संघाला खाली हात परतावे लागणार आहे. कारण ऑस्ट्रेसलियन महिला संघाने घरच्या मैदानावर वर्चस्व कायम ठेवले आहे. भारताला एकदिवसीय मालिकेत ३-० ने पराभव पत्काराव लागला आहे. तिसऱ्या सामन्यात स्मृती माधनानने शतकी खेळी केली; परंतु, इतर फलंदाज अपयशी ठरल्यामुळे भारताला हा सामना ८३ धावांनी गमवावा लागला.

दरम्यान, ऑस्ट्रेलियन फलंदाजानी भारतीय गोलंदाजी समोर तुफान फटकेबाजी केली. मधल्या फळीतील फलंदाजांनी ऑस्ट्रेलिसाठी मोठी धावसंख्या उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. सलामीवीर फोबे लिचफिल्डने (२५) व जॉर्जिया वॉलने (२६) दोघींनी संयमी खेळीसह ५८ धावांची भागिदारी केली. त्यानंतरचे दोन विकेट्स मागोमाग गेले. पण त्यानंतरच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजीला नमवले. ॲनाबेल सदरलँड व ॲशे गार्डनर यांनी ९६ धावांती भागीदारी केली. अर्धशक करून गार्डनर बाद झाल्यानंतर सदरलँड तहलिया मॅकग्राला साथीला घेत फटकेबाजी सुरूच ठेवली आणि पुन्हा मोठी भागीदारी उभारली. त्यांची शतकी भागीदारी ऑस्ट्रेलियाला ३०० धावांच्या जवळ घेऊन गेली. पण ४९ षटकात पाचव्या चेंडूवर ॲनाबेल धावबाद झाली आणि ऑस्ट्रलियाचा डाव २९८ धावांवर संपुष्टात आला.

मोठ्या लक्ष्याच्या पाठलाग करताना भारतीय संघ आक्रमक अंदाजात मैदानावर उतरला होता. परंतु, १६ धावांवर पहिला बळी गमावला. स्मृती मानधना व हर्लिन देओलने भारताच्या डावाला गती दिली. त्यांनी ११८ धावांची शतकी भागीदारी केली. त्यानंतर २८ व्या षटकात हर्लिन देओल ३९ धावा करून तंबूत परतली. सध्या स्मृती मानधना ८९ व कर्णधार हरमनप्रीत कौर ५ धावांवर खेळत होती. २८ व्या षटकात हर्लिन बाद झाली अन् भारताचा डाव घरंगळला. स्मृतीने शतकी खेळी केली, परंत, ती देखील १०५ धावांवर बाद झाली आणि भारताने मालिकेतील तिसराही सामना गमावला.

## कुस्तीत विवेक माळीचे यश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील मार्केवाडी गावातील रहिवाशी असलेला विवेक मनोहर माळी या तरुणाने कॉलेजच्या माध्यमातून मुंबई विद्यापीठाच्या कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक मिळावीत घवघवीत यश मिळविले आहे. विवेक माळी हा रसायनी येथील पिल्ले अभियांत्रिकी महाविद्यालयात इंजिनीयरिंगचे शिक्षण घेत आहे.



मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा कल्याण येथील एसएच मुठा कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत पिल्ले कॉलजचे प्रतिनिधित्व करताना कुस्तीमध्ये कांस्यपदक मिळवून मोठे यश मिळविले आहे. यानिमित्ताने विवेककडून कर्जत तालुक्याचे नाव उंचावले गेले असल्याची प्रतिकृती कर्जत तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष भगवान धुळे यांनी व्यक्त केली आहे.

## शिव हीलमचा देशात डंका

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

हरियाणातील पंचकुला येथे २५वी कनिष्ठ सिकाई मार्शल आर्ट राष्ट्रीयस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा ७ ते ९ डिसेंबर रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत अलिबागच्या तीन खेळाडूंनी नेत्रदिपक कामगिरी करत अलिबागसह महाराष्ट्राचे नाव संपूर्ण देशभरात उंचावले आहे. या स्पर्धेत १८ वर्षा खालील ४० किलो गटात लोबा (फाईट) प्रकारात उपांत्य फेरीत कर्नाटक, गोवा व आंतिम फेरीत ओडिसाला हरवत शिव देवजी हीलम याने महाराष्ट्रासाठी १ सुवर्णपदक पटकाऊन नेत्रदीप कामगिरी केली आहे. तसेच, देवदत्त पडवळ याचे १४ वर्षाखालील गटात देशभरात पाचवे स्थान आले व ऋग्वेद नाईक याचे १४ वर्षाखलील ३७ वजनी गटात देशभरात पाचवे स्थान आले आहे. अलिबागच्या



या खेळाडूंचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. या सर्व खेळाडूंना मास्टर विजय तांबडकर, प्रियंका गुंजाळ, शुभम नखाते व वेदांत सुर्वे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

## मुलांच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असो. च्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या तेवीस वर्षाखालील मुलांच्या जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला सोमवारपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील एकूण सोळा नामांकित क्लब, अकॅडमीच्या संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे. ही स्पर्धा एकदिवसीय ४० षटकांची असून प्रथम सकाळी व नंतर बाद फेरी नुसार आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेत एकूण २७ एकदिवसीय सामने होणार आहेत. स्पर्धेत खेळल्या गेलेल्या सामन्यात खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारावर संघाची निवड करण्यात येईल व निवडलेला संघाचे पुढे सराव सामने व शिबिराचे आयोजन रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम संघाची निवड करून रायगड जिल्ह्याचा संघ महाराष्ट्र क्रिकेट असो. आयोजित क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल. संपुर्ण स्पर्धेचे आयोजन खारघर येथील बी.पी पाटील, घरत क्रिकेट, साई सुरज, पनवेल येथील ४० प्लस गावदेवी तेंभोडे आणि पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज या क्रीडांगणांवर होणार आहेत.

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक यांच्यासह सर्व कार्यकारी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

RAIGAD DISTRICT CRICKET ASSOCIATION
U-23 MEN'S

## व्यक्तिमत्व विकास स्पर्धा संपन्न



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका शिक्षण विभागाच्या क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धा बीट पातळीवर घेण्यात येत आहेत. जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि सेस फंडाच्या माध्यमातून होणाऱ्या कळंब येथे आयोजित करण्यात आलेल्या बीट निहाय तालुका स्तरीय स्पर्धेत ६ केंद्रातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी गेली अनेक वर्षे स्पर्धेपासून दूर असलेले बेचकी, नेम धरणे, लंगडी, दोरी उड्या या स्पर्धांचा समावेश करण्यात आला आहे. वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धेतून निवड झालेले विद्यार्थी आणि खेळाडू हे तालुका स्तरीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

कळंब बीटमध्ये वारे, खांडस, नांदगाव, कळंब आणि दहिवली माले या पाच केंद्रातील केंद्रस्तरावरील विजेते संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. या खेळाडूंमध्ये क्रीडा सामने आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये चांगलीच चुरस पहावयास मिळाली. यावर्षी मुलांसाठी लगोरी आणि बेचकीने नेम धरणे असे ग्रामीण खेळ सहभागी करण्यात आले आहेत. मुलींसाठी लंगडी व दोरी उड्या यांचा पहिल्यांदाच समावेश करण्यात आला आहे. मागील काही वर्षात दुर्लक्षित राहिलेल्या या पारंपारिक क्रीडा प्रकारांना पुन्हा नव्याने चालना मिळाली आहे. सांस्कृतिक स्पर्धा अंतर्गत समूहगीत गायन, समूहनृत्य आणि पथनाट्य या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

## स्वस्तिक, अभिनवची अंतिम फेरीत धडक



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

स्वस्तिक क्रीडा मंडळ व अभिनव क्रीडा मंडळ यांनी मुंबई उपनगर कबड्डी असो.ने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पूर्व विभागात अंतिम फेरीत धडक दिली आहे. महिलांत महात्मा फुले स्पोर्टस् संघाने, तर कुमार गटात पार्ले स्पोर्टस् 'अ'ने अंतिम फेरी गाठली आहे. कांदिवलीतील दादोजी कोंडदेव क्रीडांगणावर या स्पर्धा पार पडत आहेत.

किशोर गटाच्या उपांत्य सामन्यात स्वस्तिक मंडळाने नवशक्ती अकादमीचा ३९-३७ असा कडवा प्रतिकार मोडून काढत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. विश्रांतीला दोन्ही संघ १८-१८ अशा बरोबरीत होते. विश्रांतीनंतर स्वस्तिकच्या वंश कदम, आदित्य गुडेकर यांनी आपला खेळ उंचावत २ गुणांनी सामना आपल्या बाजूने झुकवीला. दुसऱ्या सामन्यात अभिनव क्रीडा मंडळाने लालबत्ती कला क्रीडाचा ४३-२४ असा सहज पराभव करीत अंतिम फेरी गाठली आहे. मध्यांतराला २ लोण देत २९-०७ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या अभिनवला नंतर मात्र लालबात्तीने चुरशीची लढत दिली. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती.

महिला पूर्व विभागाच्या उपांत्य सामन्यात महात्मा फुले स्पोर्टस्ने शिवशक्ती स्पोर्टस्चा २३-१६ असा पराभव करीत अंतिम फेरीत खेळण्याचा मान पटकाविला आहे. पहिल्या डावात ११-०८ अशी आघाडी घेणाऱ्या महात्माने त्याच संयमाने खेळ करीत ७ गुणांच्या फरकाने सामना आपल्या नावे केला आहे. प्रथम श्रेणी पूर्व विभागात अंबिका सेवाने मुलुंड क्रीडा केंद्रावर २५-२१ अशी मात करीत उपांत्य फेरी गाठली आहे. पूर्वार्धात ९-८ अशी आघाडी घेणाऱ्या अंबिकाने उत्तरार्धात आपल्या खेळाची गती वाढवीत सामना आपल्याकडे झुकविला. दुसऱ्या सामन्यात अमरज्योत मंडळाने बलाढ्य अशा चेंबूर क्रीडाला २२-२१ असे चकवीत उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला आहे. पूर्वार्धात ०९-११ अशा २ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या अमरज्योतने उत्तरार्धात कमबॅक करीत या विजयाला गवसणी घातली आहे.

कुमार गटाच्या पश्चिम विभागात पार्ले स्पोर्टस् 'अ'ने हीड इंडियाचा ५५-२१ असा धुव्वा उडवीत अंतिम फेरीत धडक दिली आहे. व्यावसायिक गटात साईश्रध्दा सप्लीमेशन संघाने बीएआरसीवर २३-२० अशी मात करीत अंतिम फेरी गाठली आहे. पहिल्या डावात दोन्ही संघ ११-११ असे बरोबरीत होते.

## मुश्ताक अली स्पर्धेत मुंबई 'अजिंक्य'

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धेत मुंबईने यंदाच्या पर्वात दुसऱ्यांदा २०० हून अधिक धावांचा पाठलाग केला आहे. फक्त केरळविरुद्ध २३५ धावांचे लक्ष्य मुंबईला पेलवले नव्हते. दरम्यान, बुधवारी झालेल्या सामन्यात अथर्व तायडे (४१) व करुण नायर (२६) यांनी विदर्भला चांगली सुरूवात करून दिली होती. ए. वानखडेच्या ५१ आणि एस दुबेच्या ४३ धावांच्या खेळीने विदर्भाला २२१ धावांपर्यंत पोहोचवले होते. यावेळी मुंबईच्या शार्दूल ठाकूर, सुर्यांश शेडगे या गोलंदाजांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

लक्षाचा पाठलाग करताना पृथ्वी शॉ आणि अजिंक्य रहाणे यांनी पहिल्या ६ षटकांत ८३ धावांची वादळी फटकेबाजी केली. पृथ्वी शॉ ४९ धावांवर झेलबाद झाला. श्रेयस ५ धावा करून माघारी परतला. सूर्यकुमार यादव ९ धावांवर माघारी परतल्याने मुंबई संघ अडचणीत आला होता. अजिंक्यने एका बाजूने फटकेबाजी सुरू ठेवली आणि त्याने ४५ ८४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. अजिंक्यच्या विकेटनंतर मुंबईचे जिंकणे अवघड वाटत होते. परंतु, शिवम दुबे (३७) व सूर्यांश शेडगे (३६) यांनी सामना फिरवला. सुर्यांशने १७व्या षटकात २४ धावा कुटल्या आणि मुंबईने ६ गडी राखून हा सामना जिंकला.

पंढरपूर ते पंजाब सायकलस्वारी; दोन हजार किमी २२ दिवसांत सर

## अलिबागच्या रविकिरण आवलेची आध्यात्मिक वारी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

हरी नामाचा जप करत पंढरपूर येथून संत शिरोमणी नामदेव महाराज यांची कर्मभूमी असलेल्या पंजाबपर्यंत घुमानपर्यंत अलिबागच्या एका माऊलीने सायकल वारी केली आहे. या सायकल वारीसाठी अलिबाग रायडर्स ग्रुपचे रविकिरण आवले यांनी २२ दिवसांमध्ये ही यात्रा पूर्ण केली आहे. सर्वात लांब अंतर कापणारी ही भारतातील सर्वात मोठी सायकल यात्रा मानली जाते. या पालखीचे आयोजन नामदेव समाजउन्नती परिषद, भागवत धर्मप्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव दरबार कमिटी घुमान यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी आयोजित करण्यात येते.

संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील नामदेव पायरीपासून सुरु होणारी सायकल व रथ यात्रा साधारणपणे २ हजार ४५० किलोमीटर अंतर कापत नामदेव महाराजांची उत्तरार्धातील कर्मभूमी पंजाबमधील घुमान येथील त्यांच्या मानिव समाधीपर्यंत दरवर्षी आयोजित केली जाते. ही यात्रा महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा व पंजाब अशा पाच राज्यातून प्रवास करून पाकिस्तानच्या सीमेवर असणाऱ्या व संत शिरोमणी नामदेव महाराज यांनी वसवलेल्या घुमान येथील मानिव समाधीपर्यंत पोहोचते. या सर्वांचे नियोजन पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे व चंद्रकला भिसे आदींच्या मार्फत केले जाते. या यात्रेसाठी अलिबाग रायडर्स ग्रुपचे रविकिरण आवले यांनी २२ दिवसांमध्ये ही यात्रा पूर्ण केली आहे. या यात्रेसाठी त्यांची पूर्वतयारी राम जोशी व उमेश वाळंज यांनी प्रत्यक्षात करून घेतली होती.





तसेच, अलिबाग रायडर्स ग्रुपमधील सर्व सदस्यांचे मार्गदर्शन रविकिरण यांना लाभले आहे.

नामदेव महाराज यांनी त्यांच्या जीवनकाळातील २२ वर्षे पंजाबमधील घुमान या गावामध्ये अध्यात्मिक कार्य केले व शीख धर्मीयांच्या गुरुग्रंथसाहिबमध्ये त्यांची ६१ पदे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. या सायकलवारीत नामदेव महाराज यांनी भागवत धर्माच्या प्रचारार्थ केलेल्या शांती, समता व बंधुता या संदेशाचा प्रचार व प्रसार करण्यात येतो. महाराष्ट्र व कर्नाटकातील सर्वच समाजांमधून या वारीमध्ये मोठ्या प्रमणात लोकांचा सहभाग असतो. दरम्यान, या सायकल वारीचे सर्व ठिकाणी फुलांची उधळण करीत टाळ-मृदुंगाच्या गजरात आनंदाने स्वागत करण्यात आले. या सायकल वारीत सहभागी झालेल्या स्वारांनी १०० ते १२५ किलोमीटर अंतर दररोज वाटचाल करून हे अंतर २१ दिवसांत पूर्ण केले आहे. १२ नोव्हेंबर रोजी कार्तिकी एकादशीला नामदेव महाराज यांच्या जयंती दिनी सुरू झालेली वारी २१ दिवसांचा प्रवास करून बुधवारी (दि.४) सायंकाळी घुमान येथे पोहोचली. गुरूवारी (दि.५) घुमानच्या दरबार कमिटीने केलेल्या सत्काराचा स्वीकार करून वारीची सांगता झाली.

## बडोद्याची बंगालवर मात

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

बडोद्याने कृणाल पांड्याच्या नेतृत्वाखाली उपांत्यपूर्व फेरीचा सामना जिंकून उपांत्यफेरी गाठली आहे. बंगालविरूद्धचा हा सामना बडोद्याने ४१ धावांनी जिंकला आहे. सामन्यात बडोद्याच्या सलामीजोडीने मोठी भागीदारी केली. तर, गोलंदाजीमध्ये हार्दिक पांड्याने कमाल करून दाखवली आहे. बडोद्याने प्रथम फलंदाजी करताना १७२ धावा केल्या. तर, बरडोद्याच्या गोलंदाजांनी बंगालचा डाव १३१ धावांवर गुंडाळला. ज्यात हार्दिक पांड्याने सामन्यात ३ बळी घेतले. तर, एवआय मेरीवाला व अतित शेठ यांना देखील प्रत्येकी ३ बळी घेण्यात यश आले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)